१०४ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, मंगळवार १९ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२३९, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 239 Marathi - Daily - Pune, 19 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in
Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
'या' मोठ्या कारणामुळे IPL प्रेक्षकांशिवाय होणार?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### शरद पवार गटाची उद्या मुंबईत बैठक

**मुंबई** - ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली २० मे रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे शरद पवार गटाची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. आगामी राजकीय घडामोडी आणि संघटनात्मक बांधणीच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीत पक्षाचे सर्व आमदार, खासदार, प्रमुख पदाधिकारी यांच्यासह नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये पराभूत झालेल्या उमेदवारांनाही उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. या बैठकीत राज्यातील बदलती राजकीय परिस्थिती, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, पक्ष विस्तार आणि जनसंपर्क अभियान यावर सविस्तर चर्चा होणार आहे. तसेच विरोधकांविरोधातील रणनीती, पक्षाची आगामी भूमिका आणि कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन केले जाण्याची शक्यता आहे. याशिवाय, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये पराभूत झालेल्या उमेदवारांच्या मतदारसंघनिहाय आढाव्यावरही चर्चा होणार आहे.

### महागाई भत्तावाढीसाठी उद्या मुंबईत धरणे आंदोलन

**मुंबई** - महागाई भत्ता (आयडीए) वाढीच्या प्रलंबित मागणीवरून केंद्रीय बीएसएनएल-एमटीएनएल पेन्शनर्स संघटना (सीबीएमपीए) आक्रमक झाली असून, १ जानेवारीपासून देय असलेली वाढ तत्काळ लागू करण्याच्या मागणीसाठी बुधवारी २० मे रोजी सांताक्रूझ (पश्चिम) येथील बीएसएनएल संकुलात धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. पेन्शनधारकांच्या हक्कांसाठी एकजुटीचा ठोस संदेश देण्यासाठी भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) मधील सर्व संघटनांची आघाडी (एयूएबी) यांच्याकडूनही २० मे रोजी 'मानवी साखळी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर सीबीएमपीए महाराष्ट्र परिमंडळातर्फे २० मे रोजी सांताक्रूझ येथील बीएसएनएल संकुलात धरणे आंदोलन होणार आहे.

# आयपीएल स्पर्धेतील क्रिकेटपटूंच्या विमानासाठी बेसुमार इंधन का वापरता? उद्योजकांचे क्रीडामंत्र्यांना पत्र

■ नवी दिल्ली



**आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल आणि डिझेलचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे. इंधनाची समस्या अतिशय गंभीर आहे हे मात्र उद्योजकांच्या एका पत्राने उघड झाले आहे. भारतीय उद्योजकांची 'चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्री' (सीटीआय) या संघटनेने केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांना पत्र लिहून सवाल केला आहे की, इंधन समस्या गंभीर असताना आयपीएलच्या क्रिकेटपटूंसाठी विमानाच्या इंधनाचा बेसुमार वापर का सुरू आहे?**

**उद्योजकांनी** मागणी केली की, हा वापर कमी करा, मोजक्या शहरांमध्ये सामने ठेवा आणि उर्वरित सामने प्रेक्षकांविना खेळवा. अशी विनंती पहिल्यांदाच होत आहे. प्रेक्षकांच्या तिकिटावर कोट्यवधीची कमाई होते, पण इंधन टंचाई इतकी जास्त आहे की, या कमाईवर पाणी सोडा आणि इंधन वाचवा असे उद्योजगांचे म्हणणे आहे. याआधी फक्त कोरोना काळात आयपीएलचे काही सामने प्रेक्षकांविना खेळवले गेले होते.

'सीटीआय'चे अध्यक्ष ब्रिजेश गोयल यांनी क्रीडामंत्री मांडवीय यांना पत्र लिहून म्हटले आहे की, यंदाची आयपीएल स्पर्धा ३१ मार्चपासून सुरू झाली आहे. आयपीएलमध्ये सहभागी असलेल्या संघांनी आतापर्यंत हजारो किलोमीटरचा हवाई आणि रस्तेमार्गे प्रवास केला आहे. स्पर्धेचे वेळापत्रक आणि विविध शहरांमध्ये केलेले सामन्यांचे नियोजन यामुळे खेळाडूंचा हा प्रवास आवश्यक होता, हे जरी मान्य केले तरी सध्याच्या परिस्थितीत अशाप्रकारे वारेमाप विमान प्रवास केल्याने सरकारवर त्याचा अतिरिक्त भार पडू शकतो. सध्या पुरवठा साखळीत बाधा निर्माण झाल्यामुळे कच्च्या तेलाचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे देशाच्या परकीय चलन गंगाजळीवर प्रचंड दबाव आहे. सरकारचे प्रत्येक कार्यालय, प्रत्येक राजकीय नेता, अधिकारी, स्वतः पंतप्रधान मोदी आणि सर्वसामान्य माणूस असे सर्वच लोक इंधनबचत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत. अशा वेळी आयपीएल स्पर्धेवर मात्र देशावर ओढवलेल्या संकटाचा काहीही परिणाम झालेला नाही असे दिसते, हे संतापजनक आहे. हजारो प्रेक्षकांनी जर हे सामने पाहण्यास प्रवास केला नाही तर भरपूर इंधन वाचेल.

इंधनाची बचत करण्यासाठी आयपीएलच्या उर्वरित कार्यक्रमात बदल करून सामने प्रेक्षकांविना आणि मोजक्या शहरांत खेळवले गेले तर संघांचा प्रवासही कमी होईल. तसेच प्रेक्षकांकडून खर्च होणारे इंधनही वाचेल. आयपीएलमधील क्रिकेटपटू स्वतंत्र बोईंग-७३७ किंवा एअरबस ए-३२० यांसारख्या विमानांचा वापर करतात. या विमानांना एका तासासाठी २,४०० ते ३ हजार लीटर उच्च दर्जाचे अ‍ॅव्हिएशन टर्बाईन फ्युएल (एटीएफ) लागते. या हिशेबाने विमान प्रवास दोन तासांचा असेल तर त्यासाठी सुमारे ५ ते ६ हजार लीटर इंधनाचा वापर होतो. प्रवास दोन तासांहून जास्त कालावधीचा असेल आणि विमान जास्त वजनाचे असेल तर हा आकडा » पान ५ वर

## डोनाल्ड ट्रम्प यांचे ९० दिवसांत तबल ३,७०० शेअर व्यवहार

### वॉल स्ट्रीटवर खळबळ




**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २०२६ च्या पहिल्या तीन महिन्यांत ३,७०० हून अधिक शेअर व्यवहार केल्याची माहिती उघड झाली आहे. या मोठ्या प्रमाणातील व्यवहारांमुळे वॉल स्ट्रीट (अमेरिकेचे आर्थिक केंद्र असलेला रस्ता) वर खळबळ उडाली आहे. याआधी २०२५ च्या शेवटच्या तिमाहीत ट्रम्प यांनी केवळ ३८० व्यवहार केले होते. मात्र, यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत त्यांनी दररोज सरासरी ४० पेक्षा जास्त व्यवहार केले. तंत्रज्ञान, वित्त, संरक्षण, विमाननिर्मिती आणि मीडिया क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांमध्ये ट्रम्प किंवा त्यांच्या सल्लागारांनी कोट्यवधी डॉलरचे व्यवहार केले आहेत.**

■ वॉशिंग्टन

**राष्ट्राध्यक्ष** ट्रम्प यांनी एनव्हिडिया, ओरॅकल, मायक्रोसॉफ्ट, बोईंग आणि कॉस्टको यांसारख्या कंपन्यांचे प्रत्येकी किमान १० लाख डॉलर किमतीचे शेअर्स खरेदी केले आहेत. याशिवाय त्यांनी अ‍ॅमेझॉन, मेटा, उबर, इबे, डॉलर ट्री यांच्याशी संबंधित शेअर व्यवहारही केले आहेत. १० फेब्रुवारी रोजी ट्रम्प यांनी मायक्रोसॉफ्ट, मेटा आणि अमेझॉनमधील ५० लाख ते २.५ कोटी डॉलर किमतीची गुंतवणूक विकल्याचीही माहिती उघड झाली आहे. या कंपन्यांपैकी अनेक कंपन्या थेट अमेरिकन सरकारी धोरणे, नियम आणि भू-राजकीय निर्णयांवर अवलंबून आहेत. उदाहरणार्थ, एनव्हिडियाला चीनला एआय चिप्स निर्यात करण्यासाठी अमेरिकन सरकारची मंजुरी आवश्यक असते. बोईंगला संरक्षण आणि विमान क्षेत्रातील सरकारी कंत्राटांवर मोठ्या प्रमाणात » पान ७ वर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## कॉर्पोरेटमुळे देशात साडेबारा लाख औषध विक्रेत्यांचा व्यवसाय संकटात

■ मुंबई

**ऑनलाईन** औषध विक्री, कॉर्पोरेट कंपन्यांकडून दिले जाणारे मोठे डिस्काउंट आणि बनावट औषधांच्या वाढत्या धोक्याविरोधात अखिल भारतीय औषध विक्रेते संघटना आक्रमक झाली आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अनेक वेळा निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे या औषध विक्रेत्यांनी २० मे रोजी देशव्यापी बंदची घोषणा केली. या दिवशी एक हजार विक्रेते आझाद मैदानावर काळ्या फिती लावून आंदोलन करणार आहेत. तर देशातील साडेबारा लाख औषध विक्रेते या आंदोलनात सहभागी होणार आहेत, अशी माहिती अखिल भारतीय औषध विक्रेते संघटनेचे सचिव अनिल नावंदर यांनी दिली. सरकार कॉर्पोरेट कंपन्यांच्या अधीन झाले आहे का, असा सवालही त्यांनी यावेळी केला.

**२० मे रोजी औषध दुकाने बंद**



अखिल भारतीय औषध विक्रेते संघटनेने मुंबईत आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी संघटनेचे पदाधिकारी जयेश कोठारी, प्रसाद दानवे उपस्थित होते. यावेळी अनिल नावंदर म्हणाले की, औषध व्यवसाय औषधे आणि सौंदर्यप्रसाधने कायद्यानुसार ऑनलाईन औषध विक्रीसाठी कायदेशीर तरतूद नाही. » पान ७ वर

## डहाणूत वऱ्हाडाच्या ट्रकच्या भीषण अपघातात १२ ठार

■ डहाणू

**साखरपुड्यासाठी** निघालेल्या वऱ्हाडाच्या ट्रकला कंटनेरने धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात किमान १२ जणांचा मृत्यू झाला असून, २० हून अधिक जण जखमी आहे. मुंबई अहमदाबाद महामार्गावरील डहाणू तालुक्यातील धानिवरी येथे आज दुपारी हा अपघात घडला.

डहाणू तालुक्यातील धानिवरी परिसरात साखरपुड्यासाठी आयशर गाडीतून शंभर जणांचा गट निघाला होता. सोमवारी दुपारी ४ च्या सुमारास महामार्गाजवळील धानिवरी येथे अचानक कंटेनर आणि ट्रकची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक इतकी प्रचंड होती की, दोन्ही वाहने रस्त्यावरच उलटली. या अपघातात किमान

**२० जण जखमी**

१२ जणांचा जागीच मृत्यू झाला असून, २० हून अधिक जण गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतकार्य सुरू केले. जखमींना तातडीने कासा उपजिल्हा » पान ७ वर

## परिषदेत उद्धव ठाकरेंची केवळ ३१.५८% उपस्थिती! अनेक नेते अधिवेशनातून गायब

■ मुंबई



**विधान** परिषदेतील सदस्यांच्या उपस्थितीच्या आकडेवारीनुसार अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गेल्या चार वर्षांत केवळ ३१.५८ टक्के उपस्थिती नोंदवल्याचे स्पष्ट झाले आहे. तर काही सदस्यांनी सलग तीन अधिवेशनांमध्ये एकदाही सभागृहात हजेरी लावलेली नाही. दुसरीकडे काही सदस्यांनी ९० ते १०० टक्के उपस्थिती राखत आदर्श कामगिरी केली आहे. त्यामुळे विधान परिषदेतील सदस्यांच्या कामकाजात मोठी तफावत दिसून येत आहे.

२०२० मध्ये विधान परिषदेत प्रवेश केलेल्या उद्धव ठाकरे यांनी एकूण १३३ बैठकींपैकी केवळ ४२ बैठकींना उपस्थिती लावली. त्यामुळे त्यांची उपस्थिती केवळ ३१.५८ टक्के इतकी राहिली. २०१९ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळातील उपस्थितीची अधिकृत नोंद उपलब्ध नसली, तरी २०२२ मध्ये मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या उपस्थितीत मोठी घसरण झाल्याचे दिसते. राजीनाम्यानंतरच्या पावसाळी अधिवेशनात » पान ७ वर

## गडकरींच्या कौटुंबिक व्यवसायाला फटका युद्धामुळे कंटेनर अडकले! कोट्यवधींचे नुकसान

■ मुंबई

**अमेरिका-इराण** युद्धाचा परिणाम संपूर्ण जगासह भारतीय व्यापारावर झाला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कुटुंबाच्या व्यवसायालाही अमेरिका-इराण तणावाचा मोठा फटका बसल्याची माहिती स्वतः नितीन गडकरी यांनी दिली आहे. युद्धामुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत होऊन शेकडो कंटेनर मार्गातच अडकून राहिल्याने मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागल्याचे गडकरी यांनी सांगितले आहे.

नागपुरात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना गडकरी यांनी त्यांच्या कुटुंबाच्या उद्योगासमोरील अडचणी उघडपणे



मांडल्या. ते म्हणाले की, त्यांच्या कुटुंबाचा डिटर्जंट उत्पादनाचा व्यवसाय आहे. साखरेपासून तयार होणाऱ्या या उत्पादनाची जबाबदारी त्यांच्या सुनेकडे आहे. दर महिन्याला जवळपास शंभर कंटेनर अमेरिकेत पाठवले जात होते. मात्र, मध्य पूर्वेत तणाव वाढल्यानंतर आंतरराष्ट्रीय वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाला आहे. त्यामुळे कंटेनरची वाहतूक थांबली आहे. याचा संपूर्ण व्यवसायाला मोठा धक्का बसला. पूर्ण धंदाच बसला आहे. मात्र, या संकटातही हार न मानता स्थानिक बाजारपेठेत माल विक्री सुरू केली. मुलाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारालाही या परिस्थितीचा गंभीर फटका बसला. भारतातून इराणला मोठ्या प्रमाणात केळी निर्यात केली जात होती, तर इराणहून सफरचंद भारतात आणली जात होती.

## पवारांच्या प्रगत शेतीच्या बारामती बालेकिल्ल्यात यंदाही तीव्र पाणीटंचाई

■ बारामती

**शरद पवार,** पार्थ पवार, सुनेत्रा पवार, रोहित पवार यांच्या प्रगत शेतीचे गुणगान पंतप्रधान मोदीही गातात, पण दशकांपासून पवार कुटुंबाचा बालेकिल्ला असलेल्या बारामती जिल्ह्याची

**टँकरसाठी प्रस्ताव सादर**

पाण्याची समस्या काही पवार कुटुंब सोडवू शकलेले नाही. यंदाही उन्हाची तीव्रता वाढू लागताच बारामती तालुक्यात पाणीटंचाईची समस्या गंभीर बनू लागली आहे. गेल्यावर्षी एकही टँकरची गरज न भासणाऱ्या बारामती तालुक्यातील २४ गावांनी पाण्यासाठी टँकरची मागणी केली आहे. सध्या यातील काही गावांमध्ये टँकर सुरूही झाले आहेत.

यंदा वाढत्या तापमानामुळे विहिरी, कूपनलिका आणि सार्वजनिक पाणी योजनांवरील ताण वाढल्याने पाणी आटल्याने प्रशासनाला टँकर सुरू करण्याची वेळ आली आहे. बारामती पंचायत समिती व तहसील कार्यालयाने नुकताच तालुक्यातील २४ गावांचा आढावा घेतला. ५ मे ते ११ मे या कालावधीत गाडीखेल, सोनवडी सुपे, देऊळगाव रसाळ, अंजनगाव, थोपटेवाडी, कारखेल, सावळ, जैनकवाडी व मोराळे या ९ गावांना टँकर सुरू केले आहेत.

**अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने शनिवार १६ मे पासून रशियन समुद्री कच्च्या तेलाच्या खरेदीवरील सवलत रद्द केली आहे. यामुळे प्रामुख्याने भारताला रशियाकडून सवलतीच्या दरात मिळणाऱ्या कच्च्या तेलाच्या आयातीला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. देशातील पेट्रोल, डिझेलसह इतर इंधनाचे दर वाढून महागाईचे संकट घोंघावण्याची शक्यता आहे.**

## रशियन तेलाच्या खरेदीची सवलत अमेरिकेकडून रद्द

■ नवी दिल्ली

**अमेरिका**-इराणमधील वाढता तणाव व होर्मुज सामुद्रधुनीत उद्‌भवलेल्या युद्धाच्या परिस्थितीमुळे जागतिक




स्तरावर तेलाचा तुटवडा निर्माण झाला होता. त्यातच अमेरिका व युरोपियन देशांनी रशियावर कठोर निर्बंध लादले होते. परंतु जागतिक स्तरावरील तेलाचा तुटवडा रोखण्यासाठी अमेरिकेने मार्चमध्ये भारताला रशियन तेल खरेदीसाठी तात्पुरती सवलत दिली होती. ही सवलत १६ मे पर्यंत वाढवली होती. ही मुदत आता संपली आहे.

युरोपियन देशांच्या विरोधामुळे ही सवलत मुदत वाढवलेली नाही.

**इंधन दरवाढीची भीती**

तेल खरेदीच्या सवलतीमुळे रशिया हा भारतासाठी स्वस्त तेलाचा मोठा स्त्रोत बनला होता. मात्र आता सवलत संपल्यामुळे भारतीय तेल कंपन्यांना रशियाकडून कच्च्या तेलाची नवीन खेप खरेदी करणे कठीण झाले आहे.

## नीट पेपरफुटी प्रकरणात लातूरच्या शिवराज मोटेगावकर यांना अटक

■ लातूर

**देशभरात** खळबळ उडवून दिलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने आज लातूर येथील 'रेणुकाई करिअर सेंटर' (आरसीसी)चे संचालक शिवराज रघुनाथ मोटेगावकर यांना पुण्यातून अटक केली. परीक्षेपूर्वीच विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देणाऱ्या या रॅकेटमधील ते एक सूत्रधार असल्याचा संशय आहे. त्यांच्याकडे परीक्षेच्या दहा दिवसांपूर्वीच प्रश्नपत्रिका उपलब्ध असल्याचा संशय आहे. या प्रकरणातील ही दहावी अटक आहे. त्यांना सीबीआय कोर्टाने ९ दिवसांची कोठडी सुनावली आहे.

शुक्रवारी पहाटेच सीबीआयचे अधिकारी शिवराज मोटेगावकर यांच्या सुतमील

**विद्यार्थ्यांचीही चौकशी**

परिसरातील निवासस्थानी दाखल झाले होते. घरातील कागदपत्रे, विद्यार्थ्यांशी संबंधित नोंदी तसेच इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तपासणी करण्यात आली होती. त्यानंतर पथकाने उद्योग भवन परिसरातील आरसीसीच्या » पान ७ वर

## उमर खालिदला जामीन मिळायला हवा होता! सुप्रीम कोर्टाचे निरीक्षण

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने एका प्रकरणातील आरोपीच्या जामीन प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान दिल्ली दंगल कट प्रकरणात सप्टेंबर २०२० पासून तुरुंगात असलेल्या उमर खालिद यांच्या जामिनाबाबत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने म्हटले की, युएपीए कायद्यांतर्गत जामीन देण्याबाबत २०२१ मध्ये दिलेल्या महत्त्वाच्या निकालातील तत्त्वांचा उमर खालिद यांचा जामीन अर्ज फेटाळताना योग्य वापर करण्यात आला नव्हता. उमर खालिद यांचा जामीन अर्ज जानेवारी २०२६ मध्ये फेटाळण्यात आला होता.



त्यानंतर एप्रिलमध्ये त्यांची पुनर्विचार याचिकाही सर्वोच्च न्यायालयाने नाकारली होती.

२०२१ मध्ये भारत सरकार विरुद्ध के. ए. नजीब प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की, खटल्याला विलंब होत असेल आणि आरोपीचा जलद सुनावणीचा मूलभूत हक्क बाधित होत असेल, तर युएपीएसारख्या कठोर कायद्यांतर्गतही जामीन दिला जाऊ शकतो. मात्र हे तत्त्व उमर खालिद यांच्या प्रकरणात योग्य प्रकारे लागू झाले नाही, असे न्यायालयाने म्हटले. न्यायमूर्ती उज्जल भुयान म्हणाले की, मोठ्या खंडपीठाचा निर्णय लहान खंडपीठासाठी बंधनकारक » पान ७ वर

# ‘कोकणचा राजा’ विदेशी जातो

**आजच्याच दिवशी १८३८ साली भारतातून पहिली आंब्याची करंडी इंग्लंडच्या राणीला पाठविण्यात आली होती. रत्नागिरी हापूसच्या जागतिक प्रसिद्धीचा रंजक इतिहास.**



**हा आंब्याचा** सिझन चालू आहे:

कोकणचा आंबा जगावर राज्य करतो याला एकमेव कारण म्हणजे फ्रामजीकावसजी बाबा! आज मुंबईमध्ये राहणाऱ्या आयटी पब्लिकची राजधानी कुठली विचारली तर पवई हिरानंदानी गार्डन हे उत्तर मिळेल.

अतिशय पॉश एरिया. भल्या मोठ्या काचेच्या इमारती, मोठमोठ्या सॉफ्टवेअर कंपन्यांचं मुख्यालय. जवळच असलेल्या आयआयटीमुळे पवईची नॉलेज सिटी ही ओळख आणखी पक्की झाली आहे.

पण काही वर्षांपूर्वी इथे निबिड जंगल होतं हे कोणाला सांगून तरी पटेल काय? गोष्ट आहे १७९९ची. ब्रिटिश तेव्हा मुंबईत स्थिरावले होते. त्यांनी रस्ते बांधले, बाजारपेठ उभी केली. कुलाबा ते परळ हा भाग शहर म्हणून ओळखला जाऊ लागला. मात्र परळच्या पुढे सायन पर्यंतचा भाग मागासलेला होता. जंगलवजा खेडी होती. हा भाग विकसित करण्यासाठी ब्रिटिशांनी एक पद्धत शोधून काढली होती.

गावे आणि आसपासची जंगले लीजवर द्यायची. पवई आणि त्याच्याजवळचा भाग स्कॉट नावाच्या ब्रिटिश डॉक्टरला भाड्याने दिला होता. भाडं होत ३२०० रुपये. डॉक्टर एकदम साधेसुधे होते. खूप महत्त्वाकांक्षी नव्हते. पवईच्या जंगलातून मिळेल तेवढे उत्पन्न काढायचं एवढच त्यांचं ध्येय. आजारी पडल्यावर ते इंग्लंडला गेले. त्यांच्यानंतर या प्रॉपर्टीची काळजी घेण्यासाठी कोणीही नव्हते. कोणीही या जागेवर दावा केला नाही. अनेक वर्षे ही जागा पडीक राहिली.

अखेर १८२९ मध्ये पवईचे नशीब फिरले. फ्रामजी कावसजी बानजी नावाच्या पारसी म्हाताऱ्याने सरकारकडे अर्ज केला की पवई आणि परिसर लीजवर मिळावा. तेव्हाचा मुंबईचा कलेक्टर जॉर्ज गिल्बर हा खूप धूर्त होता. त्याने सरकारला पवई भाडेतत्त्वावर देण्याची गरज नसल्याचं दाखवत फ्रामजीकडून लीजची रक्कम वाढवून घेतली, काही अटी घातल्या. त्या अटी देखील खूप गंमतीशीर होत्या. दहा वर्षांच्या अवधीसाठी पवई भाड्याने मिळणार या काळात तिथे विहिरी, तलाव, पिण्याचे पाणी याची सोय करायची. तिथे दारू बनवली तर लोकल लोकांनाच विकायची. जंगल साफ करून शेती योग्य बनवायचे.

फ्रामजी कावसजी या सगळ्या अटीसाठी एका पायावर तयार झाले आणि लवकरच ते पवईचे मालक बनले. त्यांनी खतं वापरून जमीन कसायला सुरुवात केली. दरवर्षी एक याप्रमाणे १० विहिरी बांधल्या. गावात धर्मशाळा उभारली, तलाव दुरुस्त केले. थोड्याच दिवसात त्याने इंग्रज सरकारकडून आणखी आसपासची गावे मागून घेतली.

आज लोक मुंबईत स्क्वेअरफूट स्क्वेअर सेंटीमीटरवर घर घेतात. अशा काळात फ्रामजी पवई ते साकीनाका चांदिवली-विक्रोळी अशा महाप्रचंड भागाचा एकुलता एक मालक होता.



ब्रिटिश खूप हुशार होते. त्यांनी फ्रामजीला ज्या अटी घातल्या होत्या त्यामुळे त्यांना जमिनीचा पैसा तर मिळतच होता शिवाय गावाचा विकास होऊन तिथल्या जनतेचा आशीर्वाद देखील मिळत होता. फ्रामजी सुद्धा धूर्त होता. त्याला माहीत होते जर जास्त मेहनत केली नाही तर पवईची मालकी आपल्याला परवडणार नाही. त्याने एक हुशारी केली.

पवईच्या साडेतीन हजार एकर परिसरात आंब्याची एक लाख कलमी रोपे लावली. अवघ्या तीन वर्षांत ही रोपे बहरून आली. त्याला आंबे लगडू लागले. बॉम्बे मँगो या नावाने ते ब्रिटिश अधिकाऱ्यांच्यात फेमस देखील झाले. फ्रामजी कावसजीने तुफान पैसा छापला. इंग्रज पवईच्या आंब्यासाठी वेडे झाले होते. त्याच्या आंब्याची चर्चा इंग्लंडपर्यंत पोहोचली होती. फ्रामजीकडे व्यापारी डोके सुद्धा होते. आपले आंबे देशातून बाहेर गेले तर जास्त पैसे कमवता येईल याची खुणगाठ त्याने बांधली होती, पण असे आंबे परदेशात विकणे सोपे नव्हते, आपण पारतंत्र्यात होतो.

कोणतीही गोष्ट करायची झाली तर १०० नियम पार करावे लागायचे. फ्रामजीने एक आयडिया केली. त्याने एक दिवस ते आंबे एका करंडीमध्ये व्यवस्थित पॅक केले, त्याला एक चिठ्ठी अडकवली आणि इंग्लंडला जाणाऱ्या जहाजात ती करंडी नेऊन ठेवली.

ते आंबे सगळ्या जगावर राज्य करणाऱ्या व्हिक्टोरिया राणी करता होते. १८ मे १८३८ साली भारतातून पहिली आंब्याची करंडी निर्यात झाली. इंग्लंडच्या राणीला देखील हे आंबे आवडले. असं म्हणतात की, व्हिक्टोरिया राणीच्या एका भारतीय सल्लागारामुळे तिला आंब्याबद्दलची उत्सुकता लागली होती. त्यानंतर मात्र ती या फळाची शौकीन बनली.

व्हिक्टोरिया राणीमुळे भारतीय आंब्याला परदेशी मार्केट खुले झाले. आजही कोकणचे हापूस आंबे जगावर राज्य करतात याला एकमेव कारण म्हणजे फ्रामजी कावसजी बाबा! फ्रामजी कावसजी फक्त आंब्यावर थांबला नाही. त्याने पवईमध्ये मलबेरीची झाडे लावली, तिथे रेशीम उत्पादन सुरू केले, ऊस लावला, त्या उसापासून साखरनिर्मितीसाठी छोटा कारखाना देखील सुरू केला. उसाच्या मळीपासून दारू देखील गाळली जाऊ लागली. आज जिथे सिमेंटची जंगले आहेत त्या पवईमध्ये फ्रामजीने उसापासून ते सफरचंदापर्यंत अनेक गोष्टींचं उत्पादन घेतलंय. पुढे वय वाढेल तसा फ्रामजीला विरक्ती वृत्ती आली. त्याच लक्ष पैसा कमवण्यापेक्षा मुंबईतील लोकांचं जगणे कसे सुसह्य होईल याची तो काळजी घेत होता.

त्यानेच मुंबईमध्ये पहिली पाईपलाईन टाकली. फ्रामजीने गिरगांवातील मुगभाटमध्ये एका मैदानात तीन मोठ्या विहिरी बनवल्या, त्यातून पाणी खेचण्यासाठी वाफेच्या इंजिनाचा पंप लावला. शिवाय बैलानी ओढण्यासाठी चारचाकी गाडीही कामाला लावली. गिरगांवला पिण्याचे स्वच्छ पाणी मिळू लागले. तोपर्यंत मुंबईकरांना पाईपलाईन हा शब्दही माहीत नव्हता. इंग्रजांना जे जमलं नव्हतं ते फ्रामजीने केलं. त्याला तब्बल ३०,००० रुपये खर्च आला. आजच्या काळात त्याची किंमत काढली तर अब्जावधी रुपये होतील. पण फ्रामजीने मागेपुढे पाहिलं नाही. त्यानेच मुंबईमध्ये गॅस बत्तीची सोय केली.

आज मुंबई भारतातील सर्वात अत्याधुनिक शहर आहे, लोक याचं श्रेय इंग्रजांना देतात. मात्र त्यांच्या बरोबरच काही भारतीय देखील होते ज्यांचा दूरदृष्टीपणा मुंबईला मोठं करून गेला यातील प्रमुख नाव म्हणजे फ्रामजी कावसजी बानाजी.

त्याच्या या कार्याच्या स्मरणार्थ मुंबईमध्ये धोबीतलावाला फ्रामजी कावसजी यांचं नाव देण्यात आलं आहे.

# मुंडे-पटेल यांनी अजित पवारांचे डोके फिरवले! संजय राऊतांचा दावा

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेस अजित पवार गटातील अंतर्गत संघर्षावर बोलताना उबाठा खासदार संजय राऊत यांनी थेट धनंजय मुंडे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यावर निशाणा साधला. अजित पवारांचे डोके फिरवण्यात मुंडे आणि पटेल यांची मोठी भूमिका होती, असा दावा राऊत यांनी केला.

संजय राऊत म्हणाले की, अजित पवारांचा राष्ट्रवादी किंवा शिंदेंची शिवसेना हे पक्ष नाहीत. अजित पवार असतानाही हा कधीच पक्ष नव्हता. निवडणूक



आयोगाच्या माध्यमातून हे तयार झालेले गट आहेत. मूळ पक्ष हा शरद पवारांचा आणि उद्धव ठाकरेंचा आहे. आता त्यावर ३० जुलैला सुनावणी आहे. ते पक्ष नसून फुटलेले लोक आहेत. पक्षांना विचारधारा आणि भूमिका असते. या दोन पक्षांकडे आहे का? शिंदेंची विचारधारा बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेसारखी आहे का? आणि अजित पवारांच्या पक्षाची विचारधारा शरद पवारांच्या पक्षासारखी आहे का? प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे पार्थ पवारांवर नाराज असल्याने त्यांनी शरद पवारांकडे तक्रार केल्याची चर्चा आहे, पण मला त्याबाबत माहिती नाही.

# अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्यांचा फार्मर आयडी ब्लॉक करणार

**प्रशासनाला आदेश**

■ मुंबई

**मुख्यमंत्री** बळीराजा शेत, पांदण रस्ते योजना तसेच पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेमार्फत सुरू असलेल्या विविध विकासकामांच्या गुणवत्तेबाबत रामटेक येथे महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी शासकीय जागांवर आणि रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेत प्रशासनाला स्पष्ट आदेश दिले.

बैठकीत बोलताना जयस्वाल यांनी सांगितले की, कोणत्याही शेतकऱ्याने अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळल्यास संबंधित शेतकऱ्यांचा फार्मर आयडी ब्लॉक करण्यात यावा. तसेच अशा शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांमधील लाभ देणेही थांबवावे. यामध्ये बोनस, पीक विमा, वीज बिलावरील अनुदान, अतिवृष्टी किंवा दुष्काळातील आर्थिक मदत तसेच एनडीआरएफकडून मिळणाऱ्या सहाय्याचाही समावेश आहे.

रामटेक येथे झालेल्या या बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा शेत आणि पांदण रस्ते योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विविध विकासकामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. या बैठकीला उपविभागीय अधिकारी पियुष महाजन, गटविकास अधिकारी जयसिंग जाधव, पारशिवनीचे गटविकास अधिकारी रूपम जाधव यांच्यासह पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचे शाखा अभियंते उपस्थित होते.

# अधिक मासात जावयाला दीड किलो चांदीची कोल्हापुरी चप्पल वाण



■ कोल्हापूर

**महागाई,** सोन्या-चांदीचे वाढते दर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे काटकसरीचे आवाहन या सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरात अधिक मासानिमित्त जावयाला वाण म्हणून दीड किलो चांदीची कोल्हापुरी चप्पल दिली. या भेटीची सध्या जोरदार चर्चा रंगली आहे.

१७ मेपासून अधिक मासाला सुरुवात झाली असून, हा महिना ‘पुरुषोत्तम मास’ म्हणूनही ओळखला जातो. हिंदू परंपरेनुसार या महिन्यात जावयाला मानपान देण्याची प्रथा आहे. जावयाला कपडे, दागिने किंवा मौल्यवान भेटवस्तू देऊन सन्मान केला जातो. मात्र कोल्हापुरातील एका कुटुंबाने या परंपरेला वेगळाच थाट दिला.

कोल्हापूर जिल्ह्यातील एका कुटुंबाने लाडक्या जावयासाठी खास चांदीची कोल्हापुरी चप्पल तयार करून घेतली. ही चप्पल बनवण्यासाठी तब्बल दीड किलो चांदीचा वापर करण्यात आला आहे. कोल्हापूरचे प्रसिद्ध कारागीर विक्रांत माळी यांनी आठ दिवस मेहनत घेऊन हा अनोखा चप्पलजोड तयार केला.

सध्या चांदीचे दर विक्रमी पातळीवर असून, प्रतिकिलो चांदीचा दर पावणेतीन लाख रुपयांच्या घरात आहे.

# नागपुरात पालिकेच्या बसचा भीषण अपघात

■ नागपूर

**नागपूर** शहरातील पंचशील चौक परिसरात आज सकाळी एका ट्रकने पालिकेच्या ईलेक्ट्रिक ‘आपली’ बसला धडक दिल्याने बसमधील महिला वाहक गंभीर जखमी झाली. या अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला. याप्रकरणी बस चालकाने पोलिसांत तक्रार दाखल केली.

खापरी डेपोची इलेक्ट्रिक ‘आपली’ बस वर्धा रोडवरून झाशी राणी चौकाच्या दिशेने नियमित फेरीवर जात होती. सकाळच्या सुमारास बस पंचशील चौकाजवळ पोहोचली असता जर्नलिस्ट कॉलनीच्या दिशेने येणाऱ्या ट्रकने बसला धडक दिली. या धडकेत बसचे मोठे नुकसान झाले.

बसमधील महिला वाहक जखमी झाली असून, तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर बस चालकाला किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातावेळी बसमध्ये सुमारे चार प्रवासी होते. कोणत्याही प्रवाशाला गंभीर दुखापत झाली नाही.

# पुण्यात दोन वेगवेगळ्या घटनांत तिघांचा पाण्यात बुडून मृत्यू

■ पुणे

**पुण्यामध्ये** पाण्यात बुडून तिघांचा मृत्यू झाल्याच्या दोन वेगवेगळ्या घटनांनी हळहळ व्यक्त केली जात आहे. मावळ तालुक्यातील शिरोटा धरण येथे पर्यटनासाठी गेलेल्या दोन विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला, तर दुसऱ्या घटनेत मुळशी तालुक्यातील मुलखेड येथे मित्रांसोबत पार्टीसाठी गेलेल्या एका तरुणाचा नदीपात्रात बुडून मृत्यू झाला.

कामशेत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिरोटा डॅम परिसरात पुण्यातील सहा विद्यार्थी फिरण्यासाठी आले होते. यावेळी डॅममधील पाण्याचा अंदाज न आल्याने दोन विद्यार्थी पाण्यात बुडाले. घटनेची माहिती मिळताच कामशेत पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलीस पोहोचण्यापूर्वी स्थानिक नागरिकांनी दोघांना पाण्याबाहेर काढण्याचा प्रयत्न केला. दुसरी घटना मुळशी तालुक्यातील मुलखेड येथे



घडली. पंकज भिमराव केदारी (३६) हा तरुण मित्रांसोबत मुळा नदीपात्राशेजारी पार्टी करण्यासाठी गेला होता. दुपारच्या सुमारास तो नदीपात्रात उतरला असता पाण्यात बुडाला. घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि मित्रांनी पौड पोलीस ठाण्याला माहिती दिली. त्यानंतर पोलीस आणि मुळशी आपत्ती व्यवस्थापन समितीचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले.

# कुडाळ तालुक्यात मधमाश्यांच्या हल्ल्यात ११ ग्रामस्थ जखमी

■ कुडाळ

**तालुक्यातील** माणगाव खोऱ्यातील शिवापूर-वसोली सीमेवर आयोजित केलेल्या एका धार्मिक कार्यक्रमात अगरबत्तीच्या धुरामुळे विचलीत झालेल्या मधमाश्यांनी अचानक हल्ला चढवला. या मधमाश्यांच्या हल्ल्यात ११ ग्रामस्थ जखमी झाले असून, यातील तिघांची प्रकृती गंभीर आहे. गंभीर जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे.

शिवापूर येथे काल सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास एक धार्मिक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम सुरू असताना तेथे लावलेल्या अगरबत्तीचा धूर मोठ्या प्रमाणावर पसरला. या धुरामुळे झाडावरील पोळ्यातील मधमाश्या उठल्या आणि त्यांनी ग्रामस्थांवर अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यामुळे घटनास्थळी पळापळ सुरू झाली. या घाईगडबडीत आणि मधमाश्यांच्या डंखांमुळे लहान मुलांसह ११ जण जखमी झाले.

# मराठी फलक नसलेल्या दुकानांवर कारवाई! २९६ दुकानांना नोटीस

**९,३०६ आस्थापनांची तपासणी**

■ मुंबई

**मराठी** नामफलक लावण्याच्या नियमाचे पालन न करणाऱ्या आस्थापनांविरोधात मुंबई महानगरपालिकेने कडक भूमिका घेतली आहे. विशेष मोहिमेद्वारे मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू केली आहे. गेल्या तीन दिवसांत तब्बल ९ हजार ३०६ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २९६ दुकानांना नोटीस बजावली आहे.

महानगरपालिकेने १०० टक्के दुकानांवर देवनागरी लिपीत मराठी नामफलक लावले जावेत, यासाठी ही मोहीम राबवली आहे. शिंदे गट आणि इतर लोकप्रतिनिधींनी हा मुद्दा आक्रमकपणे उपस्थित केल्यानंतर प्रशासनाने हालचालींना वेग दिला आहे. विधी समितीच्या बैठकीत भाजपा नगरसेवक तेजिंदर सिंह तिवाना यांनी मराठी पाट्यांबाबत हरकत घेतल्यानंतर हा विषय पुन्हा चर्चेत आला. त्यानंतर महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या बैठकीत उपमहापौर संजय घाडी, विधी समिती अध्यक्षा दीक्षा कारकर आणि इतर अधिकाऱ्यांनी अमराठी फलकांविरोधात कठोर कारवाईचे निर्देश दिले.

# आज संपूर्ण मुरुड शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार

■ मुरुड जंजिरा

**जलशुद्धीकरण** केंद्र, गारंबी आणि सवतकडा धरण येथे आवश्यक देखभाल व दुरुस्तीची कामे केली जाणार असल्याने उद्या मंगळवार १९ मे रोजी संपूर्ण मुरुड शहरातील पाणीपुरवठा एक दिवसासाठी बंद राहणार आहे. तरी नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी केले आहे.

मुरुडची लोकसंख्या सुमारे १२ हजार इतकी असून, उद्या मंगळवारी शहरातील हजारो नागरिकांना एक दिवस पाण्यापासून वंचित राहावे लागणार आहे. या शहराला आंबोली धरण येथून सर्वाधिक पाणीपुरवठा केला जातो. सध्या या धरणात मुबलक पाणी असले तरी वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने जनरेटरच्या सहाय्याने पाणीपुरवठा सुरू आहे.

# विधान परिषदेच्या १७ जागांसाठी १८ जूनला मतदान होणार



■ मुंबई

**राज्यातील** पावसाळी अधिवेशनाआधी विधान परिषदेच्या सदस्यसंख्येत वाढ होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील १७ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली. या निवडणुकांसाठी १८ जून रोजी मतदान होणार असून, २२ जून रोजी मतमोजणी पार पडणार आहे. यामध्ये १७ जागांपैकी १६ जागांसाठी नियमित निवडणूक तर नागपूर मतदारसंघासाठी पोटनिवडणूक होणार आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्यामुळे या मतदारसंघांतील आमदारांचा कार्यकाळ संपल्यानंतरही निवडणुका झाल्या नव्हत्या. त्यामुळे गेल्या दोन ते अडीच वर्षांपासून अनेक जागा रिक्त होत्या. आता निवडणूक आयोगाने या रिक्त जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. यामध्ये सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर- गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना आणि नागपूर या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमध्ये पार पडणार आहेत.

# नागपूर महापालिकेचे होर्डिंगमधून नागरिकांना कर भरण्याचे आवाहन

■ नागपूर

**नागपूर** महानगरपालिकेची तिजोरी रिकामी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागपूर महानगरपालिकेने करवसुलीसाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. याअंतर्गत शहरभर होर्डिंग लावून नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

महापालिकेकडून चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर आगाऊ भरल्यास आकर्षक सवलत जाहीर केली आहे. ३१ जुलैपर्यंत कराची रक्कम भरल्यास एकूण १५ टक्के सूट दिली जाणार आहे. यामध्ये आगाऊ भरण्यासाठी १० टक्के आणि ऑनलाईन भरणा अतिरिक्त ५ टक्के सूट देण्यात येणार आहे. तसेच, नागरिकांनी कराची रक्कम महापालिकेच्या निधीत जमा केल्यास १० टक्के सूट देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. डिसेंबरपर्यंत कर भरल्यासही काही प्रमाणात सवलत मिळणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. शहरातील विविध भागांमध्ये लावण्यात आलेल्या होर्डिंगद्वारे नागरिकांना या सवलतींबाबत माहिती देण्यात येत आहे.

# कडाक्याच्या उन्हाळ्यात पसरली महाबळेश्वरात धुक्याची दुलई

**राज्याच्या अनेक भागांत उष्णतेची लाट असतानाच थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साताऱ्याच्या महाबळेश्वरमध्ये वातावरणात वेगळा बदल जाणवत आहे. या पर्यटन स्थळावर पहाटे व सायंकाळी दाट धुक्याची दुलई पसरलेली दिसत आहे.**

■ महाबळेश्वर

**ऐन** उन्हाळ्यात तापमान घसरल्यामुळे येथील प्रसिद्ध वेण्णा लेकसह डोंगर-खोऱ्यांमध्ये दाट धुक्याची दुलई अनुभवास येत आहे. महाबळेश्वरची मुख्य बाजारपेठ सायंकाळी धुक्यात हरवल्याचे चित्र पाहावयास मिळत असून, या बदललेल्या वातावरणाचा पर्यटक मनमुराद आनंद घेत आहेत. दरम्यान, दररोज हजारो पर्यटक पर्यटनासाठी या पर्यटननगरीमध्ये दाखल होत असून, येथील विविध प्रेक्षणीय स्थळे पर्यटकांच्या गर्दीने फुलून गेली आहेत. प्रामुख्याने शनिवार, रविवार या आठवड्याच्या सुट्ट्यांच्या दिवशी पर्यटक मोठ्या संख्येने येथे दाखल होत पर्यटनाचा आनंद लुटत आहेत.



# नागपूर ते मडगाव विशेष रेल्वे आता नियमित धावणार

■ मडगाव

**नागपूर** ते मडगाव दरम्यान धावणारी द्विसाप्ताहिक विशेष रेल्वे नियमित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण-गोव्याला थेट जोडणारी ही गाडी आता नियमित एक्स्प्रेस गाडी क्रमांक ११२०३/११२०४ या नवीन क्रमांकाने धावणार आहे. ही नियमित गाडी क्रमांक ११२०३ नागपूरवरून दर बुधवारी व शनिवारी दुपारी ३.०५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ५.४५ वाजता मडगाव येथे पोहोचेल. परतीची ही गाडी मडगाववरून दर गुरुवारी आणि रविवारी रात्री ८ वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी रात्री ९.३० वा. नागपूर येथे पोहोचेल. ही २४ डब्यांची गाडी वर्धा, पुलगाव, धामणगाव, बडनेरा, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, पनवेल, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, राजापूर रोड, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवीम आणि करमाळी या स्थानकांवर थांबेल.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# विद्यार्थी आत्महत्यांचे धक्कादायक प्रमाण

**भारताची** लोकसंख्या ही देशासाठी संपत्ती आहे की, आपत्ती आहे याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. ज्यावेळेला जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश असे म्हणत आपणच आपली पाठ थोपटून घेतो त्यावेळेला ही लोकसंख्या म्हणजे केवळ देशाची ओळख ठरू शकत नाही. या लोकसंख्येचा अशा प्रकारे राष्ट्रीय संपत्ती म्हणून उपयोग करून घेतला जातो. यावर बरेच काही अवलंबून आहे. चीन, जपान यासारख्या देशांनी त्या त्या देशातील विशेषतः तरुणांचा खूप नियोजनपूर्वक उपयोग करून घेतला. या लोकसंख्येला उपयुक्त ठरणारे आणि त्यांच्यामार्फत देशाच्या संपत्तीत भर घालणारे उपक्रम सुरू केले. उद्योग, व्यवसायांची निर्मिती केली म्हणजे त्या देशातल्या लोकसंख्येचा कौशल्यवाढीसाठी उपयोग करून घेतला गेला. त्यातून त्या देशांचा आर्थिक विकास तर झालाच. परंतु तिथले सामाजिक जनजीवन अधिक लोकाभिमुख आणि सकारात्मक मानसिकता निर्माण करणारे ठरले. आज भारताकडे सर्वाधिक तरुणांची संख्या आहे. परंतु या युवाशक्तीचा काटेकोरपणे किंवा कौशल्यपूर्ण उपयोग करून घेण्याची कोणतीच ध्येयधोरणे पाहायला मिळत नाही. सरकारने जरी स्टार्टअप, मेक इन इंडिया किंवा पंतप्रधान रोजगार योजना सुरू केल्या असल्या तरी त्यातून सगळ्याच युवकांना पुरेसे रोजगार व्यवसाय उपलब्ध होऊ शकलेले नाहीत. म्हणजेच तरुणांची सर्वाधिक संख्या असूनही त्याचा सकारात्मक विचार होताना दिसत नाही. आणि या नकारात्मक परिस्थितीचे तितकेच दुर्दैवी आणि गंभीर परिणाम समोर येत आहेत. याचे अगदी ताजे चिंताजनक उदाहरण म्हणजे २०२४ मध्ये भारतात तब्बल १४ हजार ४८८ विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपवले. म्हणजे देशभरात रोज चाळीस विद्यार्थी आत्महत्या करीत असल्याचे अतिशय धक्कादायक चित्र समोर आले आहे. केंद्र सरकारच्याच राष्ट्रीय गुन्हेनोंदणी अहवालानुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात तब्बल ६५ टक्के वाढ झाल्याचे स्पष्ट होते. या आत्महत्यांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रमाण ७ हजार ६६९ तर विद्यार्थिनींचे प्रमाण ६ हजार ८१९ आहे. जर देशाची ही युवाशक्ती अशा पद्धतीने आत्महत्याग्रस्त असेल तर तो मोठा धोक्याचा इशारा ठरतो.

### महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या

विशेष म्हणजे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे हा अहवाल सांगतो. २०२४ मध्ये महाराष्ट्रात १ हजार ९०९ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. म्हणजे जवळपास साडेतेरा टक्के विद्यार्थ्यांच्या आत्महत्या या एकट्या महाराष्ट्रात प्रगतीशील मानल्या जातात. जो महाराष्ट्र आर्थिक विकासात आघाडीवर असल्याचे सांगितले जाते किंवा अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्र हा अधिक पुढारलेले राज्य म्हणून ओळखले जाते. असे जर त्याचे कोडकौतुक होत असेल तर त्याचवेळेला राज्याची ही दुर्दैवी परिस्थिती अधिक धक्कादायक ठरते. विशेषतः अठरा वर्षांखालील मुलांच्या आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे आढळून आलेले आहे. देशभरात महाराष्ट्राखालोखाल उत्तर प्रदेशात १ हजार ५८५, त्यापाठोपाठ मध्य प्रदेशात १ हजार ४४७ तर तामिळनाडूमध्ये १ हजार २८७ विद्यार्थ्यांनी जीवन संपवले. आत्महत्यांमागची कारणं ही अभ्यासाचा वाढता ताण, स्पर्धा, कुटुंबामधला विसंवाद, आर्थिक परिस्थिती याबरोबरच वेगवेगळ्या कारणांनी येणारे नैराश्य गृहित धरलेले असते. परंतु ही सगळी कारणं लक्षात घेऊनच उपाययोजनांची आवश्यकता आहे. यशाची लोकसंख्या वाढत असताना आत्महत्यांचेही प्रमाण वाढत असेल तर या लोकसंख्येसाठी उपयुक्त ठरणाऱ्या वातावरणाची निर्मिती होऊ शकलेली नाही, असे म्हणावे लागेल. त्यातून ज्यावेळी विद्यार्थी ऐन उमेदीच्या काळात किंवा जिद्द, महत्त्वाकांक्षा आणि येणाऱ्या समस्यांवर मात करून यश मिळवण्याचे त्यांचे हे वय असते. त्याच काळामध्ये विद्यार्थी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात म्हणजे त्यांना आवश्यक असलेली परिस्थिती उपलब्ध होत नाही. सकारात्मक वातावरणापेक्षाही नकारात्मक परिस्थितीचा प्रभाव जास्त असतो. आणि त्या परिस्थितीला ही तरुण पिढी तोंड देऊ शकत नाही. हे आकडे केवळ त्या अहवालापुरते मर्यादित राहून चालणार नाही तर येणाऱ्या काळात या सगळ्या विद्यार्थ्यांसाठी आश्वासक वातावरण निर्माण करणे त्यांच्याशी योग्य वयात योग्यवेळी योग्य तो सुसंवाद स्थापन करण्याची व्यवस्था निर्माण करणे. पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा सुसंवाद घडवून आणणे खूप आवश्यक ठरणार आहे.

### पालकांच्या अपेक्षा


बऱ्याच वेळेला अनेक संस्थांकडून विशेषतः भारतातील हिंदू जनसंख्येचा जन्मदर वेगाने घटतो आहे. आणि इतर धर्मियांचा वाढतो आहे हे लक्षात घेऊन लोकसंख्येतला हा असमतोल धोकादायक ठरू शकतो. म्हणून दोन किंवा तीन मुलं प्रत्येक घरात असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले जाते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जास्त मुलं जन्माला घाला म्हणून जाहीर आवाहनही केले आहे. परंतु आहे त्याच लोकसंख्येत जर अशा पद्धतीने आणि तेही विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत असेल, तर वाढणारी लोकसंख्या देशावरचा मोठा भारच आहे असे म्हणण्याची वेळ येईल. विशेष म्हणजे २०१३ मध्ये या विद्यार्थी आत्महत्येचे प्रमाण ८ हजार ४२३ होते. दहा वर्षांत ते १४ हजार ४८८ पर्यंत पोहोचले. याचा अर्थ सध्या उपलब्ध असलेल्या विद्यार्थी किंवा युवाशक्तीला रोजगाराची चांगल्या करिअरची किंवा अनावश्यक स्पर्धेचीच सर्वाधिक चिंता आहे असे म्हणावे लागेल. आज वाढती महागाई आणि उत्पन्नाची अस्थिरता या कारणांमुळे कुटुंबसंख्या मर्यादित होते आहे. आणि त्या मर्यादित वेगसंख्येतही निर्माण होणारी ही नकारात्मक परिस्थिती भारताच्या युवाशक्तीचा विनाश करणारीच म्हणावी लागते. कौशल्यविकासाचे अनेक उपक्रम राबवले जातात. तरीदेखील महागडे शिक्षण आणि पालकांच्या अपेक्षा पूर्ण करीत नसल्याचे कारण सांगून जीवन संपवणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही बरेच मोठे आहे. रोज चाळीस विद्यार्थी जीवन संपवतात ही साधारण गोष्ट ठरत नाही. सरकारने आणि समाजाने याचा खूप गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

यशाची व्याख्या प्रत्येकासाठी वेगळी असते,
पण यशाचा मार्ग मात्र मेहनतीतूनच जातो.

## पंचांग



मंगळवार, १९ मे २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* अधिक ज्येष्ठ शुक्ल तृतीया
* नक्षत्र : मृग
-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मिथुन

रवी उदय- ०६-०४
रवी अस्त- १९-०६

विनायक चतुर्थी (अंगारक योग)

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१ ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)


## पाककृती

### अधिक महिन्यात बनवा धोंडे



★ **साहित्य :** १ कप हरभरा डाळ, १ कप गूळ, १ चमचा वेलची पूड, चिमूटभर जायफळ पूड, कणकेसाठी : २ कप गव्हाचे पीठ, चिमूटभर मीठ, १ चमचा तूप, आवश्यकतेनुसार पाणी तूप, केळीची पाने किंवा स्वच्छ कापड (वाफवण्यासाठी).

★ **कृती :** सर्वप्रथम हरभरा डाळ स्वच्छ धुऊन २ ते ३ तास भिजत ठेवा. त्यानंतर कुकरमध्ये डाळ मऊ होईपर्यंत शिजवून घ्या. शिजलेली डाळ गाळून त्यातील अतिरिक्त पाणी वेगळे करा. आता एका कढईत डाळ आणि गूळ एकत्र करून मंद आचेवर परता. मिश्रण घट्ट होत आले की, त्यात वेलची आणि जायफळ पूड घाला. हे पुरण पूर्ण थंड होऊ द्या. एका परातीत गव्हाचे पीठ, मीठ आणि थोडे तूप घालून मऊसर कणीक भिजवा. ही कणीक १५ ते २० मिनिटे झाकून ठेवा. कणकेचे छोटे गोळे करून त्याची पुरी लाटा. त्यात पुरण भरून मोदकासारखा किंवा अंडाकृती आकार द्या. हेच धोंडे होय. पारंपरिक पद्धतीत हे धोंडे केळीच्या पानावर ठेवून वाफवले जातात. त्यामुळे त्यांना एक वेगळाच सुगंध येतो. मोठ्या पातेल्यात पाणी गरम करून त्यावर चाळणी किंवा इडली पात्र ठेवा. त्यात केळीचे पान ठेवून धोंडे मांडावेत. साधारण १५ ते २० मिनिटे मध्यम आचेवर वाफवून घ्या. धोंडे शिजल्यावर त्यावर साजूक तूप घालून गरमागरम सर्व्ह करा किंवा तुम्ही धोंडे तळू शकता. पुरण जास्त पातळ होऊ देऊ नका, नाहीतर धोंडे फुटू शकतात. कणीक खूप कडक मळू नये.




# राजस्थान रॉयल्स संघासमोर 'करो या मरो' स्थिती

## जयपूरमध्ये आज लखनौला जोरदार टक्कर देणार

**जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर उद्या होणाऱ्या आयपीएलच्या ६४ व्या सामन्यात राजस्थान रॉयल्स आणि लखनौ सुपर जायंट्स आमनेसामने येणार आहेत. गेल्या ३ सामन्यांत दारुण पराभव झालेल्या राजस्थानसाठी हा सामना 'करो या मरो' सारखाच आहे. आयपीएलच्या प्लेऑफमध्ये जाण्यासाठी राजस्थानला उद्याचा सामना आणि २४ मे रोजी होणारा मुंबई इंडियन्सविरुद्ध सामना जिंकणे आता अनिवार्य आहे. लखनौचा संघ याआधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला असला तरी हा संघ राजस्थानला पराभूत करून अडचणीत टाकू शकतो.**



■ जयपूर

आयपीएलच्या या हंगामात राजस्थानने १२ सामने खेळवले. त्यातील ६ सामन्यांत विजय आणि ६ सामन्यांत पराभव नोंदवल्यामुळे राजस्थान आयपीएलच्या गुणतालिकेत १२ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. लखनौनेही १२ सामन्यांत आपले नशीब आजमावले आहे, त्यातील ८ सामन्यांत पराभव पत्करावा लागला आणि लखनौने फक्त ४ सामन्यांत विजय मिळवल्यामुळे गुणतालिकेत ८ गुणांसह तळाचे स्थान मिळवले आहे.

राजस्थानला प्रत्येक विभागात सुधारणा करावी लागेल. राजस्थान घरच्या मैदानावर विजयाचा दुष्काळ संपवण्याचा प्रयत्न करेल. वैभव सूर्यवंशी या हंगामात ५०० धावा करण्यापासून सुमारे १४ धावा दूर आहे. त्याने आतापर्यंत एक शतक आणि एक अर्धशतक झळकावले आहे. रॉयल्सला त्यांच्या घरच्या मैदानावर अजून एकही सामना जिंकता आलेला नाही. राजस्थानचा पुढील सामना साखळी फेरीतील त्यांच्या अंतिम सामन्यात मुंबई इंडियन्सविरुद्ध होईल. रविवारी दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात रॉयल्सला पराभव पत्करावा लागला. कारण त्यांच्या खालच्या फळीतील फलंदाज आणि गोलंदाजांची कामगिरी खराब होती. राजस्थानचे क्षेत्ररक्षणही खराब होते. चांगल्या सुरुवातीसाठी राजस्थान १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. परंतु या युवा खेळाडूला दुसऱ्या टोकाकडून यशस्वी जैस्वालकडून पुरेशी साथ मिळालेली नाही. ध्रुव जुरेलने काही प्रभावी खेळी केल्या आहेत. परंतु मागच्या सामन्यात तो थोडा संथ खेळला, तर दुसऱ्या टोकाकडून विकेट पडत होत्या. त्याच्याकडून एका वेगवान खेळीची अपेक्षा असेल. कर्णधार रियान परागने अलिकडच्या सामन्यांमध्ये चांगली कामगिरी केली आहे. शेवटच्या पाच षटकांमध्ये आपल्या संघाने अधिक अचूक फलंदाजी करावी, अशी त्याची इच्छा आहे.

## २ वर्षांनी लंका प्रीमियर लीग १७ जुलैपासून सुरू होणार

**कोलंबो-** दोन वर्षांनंतर लंका प्रीमियर लीगला (एलपीएल) १७ जुलै रोजी सुरुवात होणार आहे. या स्पर्धेचा उद्घाटनीय सामना कोलंबोच्या एसएससी मैदानावर होणार आहे. याच मैदानावर या वर्षीच्या विश्वचषकात पहिला टी-२० सामना आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेच्या अंतिम वेळापत्रकानुसार ही स्पर्धा १७ जुलै ते ८ ऑगस्ट दरम्यान चालणार आहे. एसएससी मैदानावर १७ ते १९ जुलै दरम्यान एकूण पाच सामन्यांचे आयोजन करेल, त्यानंतर ही स्पर्धा दंबुल्ला, मग कँडी आणि शेवटी कोलंबो येथे आर. प्रेमदासा स्टेडियमवर नॉकआऊट फेरी आणि अंतिम सामन्यासाठी होईल. अंतिम सामन्यासाठी ९ ऑगस्ट रोजी एक राखीव दिवसही असेल.

## ५० वर्षांनंतर सिनरच्या रुपात इटलीने इटालियन ओपनचे विजेतेपद पटकाविले

■ रोम

**इटलीचा** स्टार टेनिसपटू यानिक सिनरने इटालियन ओपनचे विजेतेपद पटकावून इतिहास रचला. जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या सिनरने रोमच्या प्रतिष्ठित फोरो इटालिको येथे झालेल्या अंतिम सामन्यात नॉर्वेच्या कॅस्पर रुडला सरळ सेट्समध्ये ६-४, ६-४ असे पराभूत केले. या विजयामुळे सिनर ५० वर्षांनंतर इटालियन ओपन जिंकणारा पहिला इटालियन पुरुष खेळाडू ठरला. यापूर्वी १९७६ मध्ये ड्रियानो पानाटाने हे विजेतेपद पटकावले होते.

सिनरचा विजय केवळ एका देशांतर्गत विजेतेपदापुरता मर्यादित नव्हता. त्याने टेनिसच्या इतिहासात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. आता तो नोव्हाक जोकोविचनंतर सर्व ९ एटीपी मास्टर्स १००० स्पर्धा जिंकणारा दुसरा खेळाडू ठरला. जोकोविचने २०१८ मध्ये ही कामगिरी केली होती, तर २४ वर्षीय सिनरने कमी वयातच या विक्रमाची बरोबरी केली आहे.

## व्हॉलीबॉल स्पर्धा! मुंबई, कोल्हापूर, पुणे, लातूरला विजेतेपद

■ बदलापूर

**क्रीडा** व युवक सेवा संचालनालय, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत मुंबई, कोल्हापर, पुणे, लातूर विभागाने विजेतेपद पटकावले. रात्री अडीच वाजेपर्यंत रंगलेल्या राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा महासंग्राम पाहण्यासाठी बदलापूरकरांचा उदंड प्रतिसाद पाहण्यास मिळाला.

बदलापूर जिमखाना मैदानावर संपलेल्या राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ आमदार किसन कथोरे व कुळगाव-बदलापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षा रूचिता घोरपडे यांच्या हस्ते झाला. या स्पर्धेत १८ वर्षांखालील मुलांच्या गटात कोल्हापूरचा संघ बाजीगर ठरला. २३-२५, २७-२५, २१-२५, २५-२० आणि १५-१२ गुणांनी नागपूरचा पराभव करत मैदान गाजवले. पहिला सेट गमविल्यानंतर कोल्हापूरने दुसऱ्या आणि चौथ्या सेटला मुसंडी मारली.




पाचव्या निर्णायक सेटमध्ये वैभव ढगेने अफलातून फटका मारून सामन्याचे पारडे फिरवले. उत्कर्ष पाटील, संजोग पाटील आणि जुनेद शेख यांनी वेगवान खेळ करत कोल्हापूरचे नाव विजेतेपदाच्या चषकावर कोरले. संघाचे आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक अजित पाटील यांनी विजेतेपदाचे शिखर गाठण्यासाठी केलेले मार्गदर्शन लक्षवेधी ठरले. २१ वर्षांखालील मुलींच्या गटात पराभवानंतर सलग ३ सेट जिंकून मुंबईने नाशिकला लोळवून विजेतेपदावर नाव कोरले. १६-२५, २५-१८,२५-१९, २५-२१ गुणांनी मुंबई अजिंक्य ठरला.

## महापौर चषक कॅरम स्पर्धेत प्रशांत आणि सोनाली विजयी

■ मुंबई

**माटुंगाच्या** लोकमान्य मंडळ बँक्वेट हॉलमध्ये संपन्न झालेल्या २३ व्या मुंबई महापौर चषक जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटाच्या अंतिम सामन्यात माजी विश्वविजेत्या रिझर्व्ह बँकेच्या प्रशांत मोरेने शिवतारा कॅरम क्लबच्या राहुल सोलंकीला २४-२०, २५-९ असे सरळ दोन सेटमध्ये हरवून या गटाचे विजेतेपद पटकावले.

मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन आयोजित आणि लोकमान्य सोसायटी (माटुंगा) यांच्या लोकमान्य मंडळाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेतील महिला एकेरीच्या अंतिम फेरीत ए. के. फाऊंडेशनच्या सोनाली कुमारीने जैन इरिगेशनच्या मिताली पाठकवर २५-०, २२-११ अशी मात करत विजय संपादन केला.

अंतिम फेरीत प्रवेश करण्यापूर्वी प्रशांतने मुंबई महापालिकेच्या विकास धरियाला २१-१४, २५-१३ आणि राहुलने डीकेसीसीच्या सिद्धांत वाडवलकरवर २२-९, २२-२१ व २५-९ अशी मात केली होती.

## दुसऱ्या कसोटीवर बांगलादेशची पकड पाकिस्तानवर ४३७ धावांची आघाडी

■ सिल्हेट

**सिल्हेट** आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सुरू असलेल्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या आणि अखेरच्या सामन्याच्या तिसऱ्या दिवशी बांगलादेशचा दुसरा डाव ३९० धावांवर आटोपला. परिणामी पाकिस्तानवर ४३७ धावांची आघाडी घेतल्यामुळे बांगलादेशने या कसोटीवर मजबूत पकड घेतली. दिवसाअखेर २ षटकांत ० धाव करून पाकिस्तानचे सलामीवीर अजान अवैस आणि अब्दुल्ला फजल नाबाद परतले.

बांगलादेशने पहिल्या डावात २७८ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात पाकिस्तान २३२ धावाच करू शकला. त्यामुळे बांगलादेशने पहिल्या डावात ४६ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात मुश्फिकुर रहीमच्या १३७ धावा आणि लिटन दासच्या ६९ धावांच्या बळावर बांगलादेशने ३९० धावा ठोकल्या.

## आरबीआय खो-खो चषकावर पश्चिम रेल्वे संघाने नाव कोरले

■ मुंबई



**परळच्या** लाल मैदानावर रंगलेला आरबीआय व्यावसायिक निमंत्रित खो-खो स्पर्धेचा अंतिम सामना हा केवळ दोन रेल्वे संघांमधील लढत नव्हती, तर तो प्रतिष्ठा, अनुभव, संयम आणि रणनीतीचा खरा कस पाहणारा महामुकाबला होता. जानेवारीत मुंबई जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत पश्चिम रेल्वेला हरवणाऱ्या मध्य रेल्वेकडून पुन्हा एकदा वर्चस्वाची अपेक्षा होती. मात्र पश्चिम रेल्वेने यावेळी कोणतीही चूक न करता अत्यंत शिस्तबद्ध आणि परिपक्व खेळ करत १५-११ असा दणदणीत विजय मिळवत आरबीआय चषकावर नाव कोरले. हा विजय सरावातील सातत्य, नियोजन आणि उत्कृष्ट संघबांधणीचे फलित होते.

मध्य रेल्वेने नाणेफेक जिंकून प्रथम संरक्षण स्वीकारले, पण त्याचा अपेक्षित फायदा त्यांना उचलता आला नाही. उलट सुरुवातीपासूनच पश्चिम रेल्वेने आक्रमणात धार दाखवत मध्य रेल्वेच्या संरक्षणफळीवर सतत दबाव निर्माण केला. मध्यंतरालाच १०-५ अशी घेतलेली आघाडीच सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरली. मध्य रेल्वेचा बचाव काही वेळा चांगला दिसला, पण निर्णायक क्षणी गुण मिळवण्यात त्यांना अपयश आले. आक्रमणावेळी समन्वयाचा अभाव स्पष्ट जाणवत होता. या विजयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे पश्चिम रेल्वेचा सांघिक खेळ होता. एक-दोन खेळाडूंवर अवलंबून न राहता संपूर्ण संघाने जबाबदारी उचलली. वृषभ वाघ यांनी २.३० व २.५० मिनिटांचे भक्कम संरक्षण करून मध्य रेल्वेच्या आक्रमणाची धार बोथट केली. आदित्य गणपुले यांनी २ आणि २.४० मिनिटांचे संरक्षण करत ४ महत्त्वाचे गुण मिळवले आणि सामन्याचे खरे 'गेम चेंजर' ठरले.

# सासाराम-पाटणा पॅसेंजरला आग! दोन बोगी जळाल्या

■ पाटणा



**बिहारमधील** सासाराम रेल्वे स्थानकावर आज पहाटे मोठी दुर्घटना टळली. प्लॅटफॉर्म क्रमांक ६ वर उभी असलेल्या सासाराम-पाटणा फास्ट पॅसेंजर (ट्रेन क्रमांक ५३२१२)च्या एका बोगीला अचानक आग लागल्याने रेल्वे स्थानक परिसरात एकच खळबळ उडाली. या आगीत ट्रेनची पाचवी बोगी पूर्णपणे जळून खाक झाली, तर चौथ्या बोगीचाही मागील भाग आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.

ही घटना आज सकाळी सुमारे पावणे सहाच्या दरम्यान घडली. रेल्वे प्रशासन, आरपीएफ आणि अग्निशामक दलाच्या तत्परतेमुळे सर्व प्रवाशांना वेळेत सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. दररोज सकाळी ६:४५ वाजता ही ट्रेन पाटणासाठी रवाना होते. आजही नेहमीप्रमाणे प्रवासी ट्रेनमध्ये चढत असताना अचानक बी-३ बोगीच्या शौचालयातून दाट धूर बाहेर येऊ लागला. रेल्वे स्थानकाजवळ मॉर्निंग वॉक करणाऱ्या स्थानिक नागरिकांच्या हा प्रकार लक्षात आला. त्यांनी तत्काळ आरडाओरडा करत आरपीएफ व रेल्वे प्रशासनाला माहिती दिली.

ट्रेन सुटण्यास अद्याप वेळ असल्याने त्यावेळी डब्यांमध्ये मोठी गर्दी नव्हती. आग लागल्याची माहिती मिळताच रेल्वे कर्मचारी आणि सुरक्षा दलांनी तातडीने संपूर्ण प्लॅटफॉर्म रिकामा करत प्रवाशांना सुरक्षितस्थळी हलवले. त्यानंतर अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले.रेल्वे कर्मचारी, स्थानिक मजूर आणि अग्निशामक दलाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे काही वेळातच आग पूर्णपणे आटोक्यात आणली.

देश विदेश

# पॅलेस्टिनींचे विस्थापन आजही सुरूच
## ममदानींच्या पोस्टवरून ज्यू संतप्त

■ न्यूयॉर्क



**अमेरिकेतील** न्यूयॉर्क शहराचे महापौर जोहरन ममदानी यांनी 'नक्बा दिना'निमित्त केलेल्या पोस्टमुळे वाद निर्माण झाला. या पोस्टमुळे न्यूयॉर्कमधील ज्यू समुदायाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून, महापौरांवर इतिहासाचे चुकीचे चित्रण केल्याचा आरोप केला. 'नक्बा' हा अरबी शब्द असून, त्याचा अर्थ 'महाविनाश' असा होतो. १९४८ मध्ये इस्त्रायल राष्ट्राची स्थापना झाली. त्यावेळी मोठ्या प्रमाणावर पॅलेस्टिनी नागरिक विस्थापित झाले. त्या घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी 'नक्बा दिन' पाळला जातो. महापौर ममदानी यांनी व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओमध्ये न्यूयॉर्कमध्ये राहणाऱ्या इनिया बुश्नाक यांची मुलाखत दाखवली होती. ममदानी यांनी त्यांना 'नक्बा पीडित' असे संबोधले. बुश्नाक यांनी १९४८ च्या युद्धावेळी आपल्या कुटुंबाला जेरुसलेममधून पलायन करावे लागल्याची कथा सांगितली.

# अफगाणिस्तानात बालविवाहाला मान्यता
## कुमारिकेच्या मौनाला संमती मानणार

■ काबूल

**अफगाणिस्तानमध्ये** तालिबान राजवट आल्यापासून महिलांवर अनेक निर्बंध घातले जात आहेत. या राजवटीने विवाह, घटस्फोट आणि बालविवाहाशी संबंधित एक नवा कौटुंबिक कायदा लागू केला आहे. या कायद्यान्वये बालविवाहाला अधिकृत मान्यता देण्यात आली आहे. एखादी 'कुमारी मुलगी' शांत राहिली, तर तिचे ते मौन लग्नासाठी तिची संमती मानले जाऊ शकते, अशी तरतूद या कायद्यात आहे. या कायद्यावर आंतरराष्ट्रीय पातळीवर टीका होत आहे.

अफगाण वृत्तवाहिनी अमू टीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार, पती-पत्नीमधील विभक्ततेचे नियम नावाच्या ३१ कलमी नियमावलीला तालिबानचा सर्वोच्च नेता हिबतुल्ला अखुंदझादा याने मंजुरी दिली आहे. ही नियमावली राजवटीच्या अधिकृत राजपत्रात प्रकाशित करण्यात आली आहे. या नियमावलीत बालविवाह, बेपत्ता पती, सक्तीने विभक्त होणे, धर्मत्याग, व्यभिचाराचे आरोप आणि इतर धार्मिक व कायदेशीर बाबींचा समावेश असलेले नियम स्पष्ट करण्यात आले आहेत.

# सिक्कीममध्ये १ जूनपासून शीख धर्मियांसाठी आनंद विवाह कायदा

■ नवी दिल्ली

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**सिक्कीममध्ये** १ जून शीख धर्मियांच्या पारंपरिक विवाहांना कायदेशीर चौकटीत बसवणारा आनंद विवाह कायदा लागू केला जाणार आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे सिक्कीममधील शीख धर्मियांना पारंपरिक 'आनंद कराज' सोहळ्यामध्ये थेट विवाह नोंदणी करता येणार आहे. त्यांना हिंदू विवाह कायदा-१९५५ अन्वये विवाह नोंदणी करणे बंधनकारक असणार नाही. सप्टेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आनंद विवाह कायद्याबाबत दिलेल्या निर्णयामुळे सिक्कीममध्ये हा कायदा लागू करणे शक्य झाले आहे.

# म्हापसा अर्बन बँक इमारतीचा गोवा सरकार ताब्यात घेणार

■ म्हापसा

**दक्षिण** गोवा जिल्ह्यातील म्हापसा येथील दिवाळखोरीत निघालेल्या म्हापसा अर्बन बँकेचे अर्थात बँक ऑफ गोवाचे प्रधान कार्यालय असलेली 'नंदादीप इमारत' ताब्यात घेण्यास सरकारला गोव्यातील मुंबई उच्च न्यायालयाने मुभा दिली. न्या. वाल्मिकी मिनेझीस व न्यायमूर्ती अमित जामसंडेकर यांच्या द्विसदस्यीय न्यायपीठाने हा निकाल दिला आहे.

सरकारने म्हापसा येथील या इमारतीची जमीन संपादित करून बँकेला दिली होती. त्यानंतर बँकेने त्याठिकाणी कराराद्वारे 'नंदादीप इमारत' उभारली होती. सरकारने या

**हायकोर्टाचा आदेश**


इमारतीचे मूल्यांकन २५ कोटी निश्चित केले आहे. ही रक्कम सरकारद्वारे ३० मार्च रोजी बँकेच्या लिक्विडेटरकडे सुपूर्द करण्यात आली. बहुराज्य सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदींनुसार ती असुरक्षित ठेवीदार व इतर धनकोंना वाटप केली जाईल.

# पाकिस्तानात ९ ठिकाणांची नावे बदलली! इस्लामपुरा पुन्हा कृष्णनगर

■ लाहोर

**भारतातील** अनेक शहरे आणि ठिकाणांची जुनी मोगलकालीन नावे बदलली जात असतानाच पाकिस्तानातील लाहोर शहरातील ठिकाणांना ऐतिहासिक आणि पारंपरिक नावे पुन्हा दिली जात आहेत. गेल्या दोन महिन्यांत शहरातील नऊ ठिकाणांची नावे बदलून जुनी नावे देण्यात आली आहेत. अनेक दशके इस्लामीकरणाच्या प्रभावाखाली राहिलेल्या लाहोरमध्ये आता जुन्या हिंदू आणि ब्रिटिशकालीन नावांचे पुनरागमन होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

या बदलांमध्ये इस्लामपुरा या भागाला पुन्हा कृष्णनगर हे जुने नाव देण्यात आले आहे, तर बाबरी मशीद चौक आता पुन्हा




जैन मंदिर चौक म्हणून अधिकृतपणे ओळखला जाणार आहे. संबंधित भागांमध्ये नवीन फलकही लावण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, या निर्णयाला कुणीही विरोध केलेला नाही. पंजाब प्रांताच्या मुख्यमंत्री मरियम नवाज यांनी लाहोरमधील ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी परकोटा शहरातील आठही दरवाजांचे नूतनीकरण करण्यात येणार असल्याचे सांगितले. यात ऐतिहासिक दिल्ली गेटचाही समावेश आहे.

दुसऱ्या टप्प्यात सिंध आणि खैबर पख्तूनख्वा प्रांतांमधील काही शहरांतील मूळ नावेही पुन्हा दिली जाऊ शकतात. लाहोरमधील बीकनहाऊस विद्यापीठाचे व्याख्याते साद मलिक यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. मी नेहमीच या भागाला लक्ष्मी चौक असेच म्हणत आलो आहे. माझे वडीलही हेच नाव वापरत असत.

# जायकवाडी धरणात ४० टक्के पाणीसाठा

■ छत्रपती संभाजीनगर

**जायकवाडी** धरणातील पाणीसाठ्यात चिंताजनक घट झाली असून सध्या धरणात केवळ ४० टक्के पाणी शिल्लक आहे. मागील महिन्यात तब्बल १६ टक्क्यांनी पाणीसाठा कमी झाल्याने मराठवाड्यात पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जायकवाडी धरणातून सुमारे ५२ लाख नागरिकांना पिण्याच्या पाणीपुरवठा केला जातो. मात्र कमी पाऊस, वाढता वापर आणि तीव्र उष्णतेमुळे जलसाठा झपाट्याने घटत असल्याची माहिती आहे. गेल्या २४ तासांतच उन्हाच्या तीव्रतेमुळे सुमारे दोन दशलक्ष घनमीटर पाण्याचे बाष्पीभवन झाले. त्यातच शेती आणि पिण्यासाठी वाढलेल्या उपशामुळे धरणातील पाण्याची पातळी आणखी खालावत आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क झाले असून पाण्याच्या वापराबाबत नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पावसाळा येईपर्यंत उपलब्ध पाणी पुरेल यासाठी जलनियोजनावर विशेष लक्ष ठेवले जात आहे.

# उत्तर प्रदेशमध्ये भीषण अपघात
## ट्रक-व्हॅनच्या धडकेत १० ठार

■ लखनौ

**बहराइच** रोडवर ऊंच गावाजवळ टाटा मॅजिक व्हॅन आणि ट्रक यांची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात १० जणांचा जागीच मृत्यू झाला. तर चार जण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या भीषण रस्ते अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाखांची सानुग्रह मदत जाहीर केली आहे.

व्हॅनमध्ये १० प्रवासी होते. त्यात ८ पुरुष तर २ महिलांचा समावेश होता. ते सर्व प्रवासी लखीमपूर खीरीला जात होते. मॅजिक व्हॅनचे नियंत्रण सुटल्याने ट्रकला जाऊन धडकली. अपघातानंतर स्थानिक लोक घटनास्थळी पोहोचले.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस अधिकारी घटनास्थळी पोहोचले.

# खरातने बेनामी खात्यातून ५२ कोटी रुपये काढले

■ नाशिक

**नाशिकमधील** भोंदूबाबा अशोक खरात याने बनावट आणि बेनामी खात्यांच्या माध्यमातून ५२ कोटींची रक्कम काढल्याचे तपासात उघड झाले आहे. ही रक्कम काढून तो परदेशात पलायन करणार असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे.

तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, काळा पैसा पांढरा करण्यासाठी आणि कर टाळण्यासाठी खरातने बँकिंग व्यवहारातील २ लाख रुपयांच्या मर्यादेचा गैरफायदा घेतला. विविध खात्यांमधून प्रत्येकी १ लाख ९९ हजार रुपयांचे व्यवहार करून मोठ्या प्रमाणात रक्कम काढण्यात आली. केवळ तीन महिन्यांत अशा पद्धतीने तब्बल ५२ कोटी रुपये काढण्यात आल्याची

**परदेशात जाण्याचीही तयारी**

माहिती तपास यंत्रणांनी दिली आहे. कोपरगाव येथील समता पतसंस्थेत तब्बल ६५ बनावट खाती उघडण्यात आली होती. अवघ्या चार दिवसांत २०० हून अधिक व्यवहार करून ही रक्कम काढण्यात आली. या खात्यांमध्ये महसूल व आरटीओ अधिकाऱ्यांसह काही प्रतिष्ठित व्यक्तींच्या नावांचाही वापर करण्यात आल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. विशेष म्हणजे, सर्व खात्यांचे संचालन आणि नॉमिनी स्वतः अशोक खरातच असल्याचेही स्पष्ट झाले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये वावी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर जानेवारी ते मार्च या कालावधीत, अटकेपूर्वीच मोठ्या प्रमाणात पैसे काढण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. अटकेची शक्यता लक्षात घेऊन खरात न्यूझीलंड किंवा ऑस्ट्रेलियात पळून जाण्याच्या तयारीत असल्याचा संशय आहे.



# महेंद्र गायकवाड ठरला हिंद केसरी
## पृथ्वीराजची दुखापतीमुळे माघार

■ सातारा

**सातारामधील** छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलात पार पडलेल्या ५२ व्या हिंद केसरी कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ आणि उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड यांच्यातील अंतिम सामना अवघ्या काही क्षणांत रंगतदार ठरण्याऐवजी दुखापतीमुळे थांबवावा लागला. पृथ्वीराजच्या हाताला गंभीर दुखापत झाल्यानंतर त्याने अखेर माघार घेतली आणि महेंद्र गायकवाडला हिंद केसरी घोषित करण्यात आले. तीनवेळा उपमहाराष्ट्र केसरी राहिलेला महेंद्र गायकवाड अखेर देशाचा ३९ वा आणि महाराष्ट्राचा १० वा हिंदकेसरी ठरला.

सामना सुरू होताच महेंद्रने आक्रमक पवित्रा घेत पृथ्वीराजवर जोरदार चढाई केली. सुरुवातीलाच त्याने दोन गुणांची कमाई करत आघाडी घेतली. त्यानंतर पृथ्वीराज खाली असताना महेंद्रने त्याचा उजवा हात पकडून डाव टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, याचवेळी पृथ्वीराजचा हात उलटा फिरल्याने तो जखमी झाला. अचानक झालेल्या या प्रकारामुळे मैदानात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आणि पंचांनी सामना तातडीने थांबवला.

# आयटी क्षेत्रातील वाढीमुळे सेन्सेक्स, निफ्टी सावरले

■ मुंबई

**आंतरराष्ट्रीय** बाजारातील नकारात्मक संकेत, कच्च्या तेलाचा भडका आणि इराण-अमेरिकेतील तणाव या कारणांमुळे आज भारतीय शेअर बाजारात मोठे चढ-उतार पहायला मिळाले. सुरुवातीला झालेल्या मोठ्या घसरणीनंतर माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील खरेदीमुळे कामकाजाच्या अखेरीस सेन्सेक्स आणि निफ्टी किरकोळ वाढीसह बंद झाले. सेन्सेक्स ७७.०५ अंकांच्या किरकोळ वाढीसह ७५,३१५.०४ अंकांवर बंद झाला.तर निफ्टी ६.४५ अंकांच्या वाढीसह २३,६४९.९५ अंकांवर स्थिरावला. आज दिवसभरात केवळ १,२१६ कंपन्यांचे समभाग वधारले.

# पालिका चतुर्थश्रेणी कामगारांना जनगणनेच्या कामगारांना जुंपले!

**म्युनिसिपल मजदूर युनियनचा तीव्र विरोध**

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना जनगणनेच्या कामासाठी जुंपले आहे. त्यामुळे या कामगारांमध्ये प्रचंड नाराजी पसरली असून प्रशासनाच्या या निर्णयाला म्युनिसिपल मजदूर युनियनने जोरदार विरोध केला आहे. नियमित काम करून हे जनगणनेचे काम करावे लागत असल्याने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पालिका आयुक्तांनी यात हस्तक्षेप करून या कामगारांना या कामातून वगळावे, अशी मागणी युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव यांनी केली आहे

जाधव यांनी म्हटले आहे की, चतुर्थ श्रेणीतील बहुतांश कर्मचारी, जसे की शिपाई, सफाई कर्मचारी, माळी आणि हमाल यांना डिजिटल किंवा ऑनलाइन कामे हाताळण्यात अडचणी येतात. अनेक कर्मचाऱ्यांचे शिक्षण असून प्रशिक्षण देऊनही त्यांना जनगणनेचे तांत्रिक काम समजून घेणे कठीण जात आहे. आधीच पालिकेच्या अनेक शाळांमध्ये शिक्षकांसह अन्य कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे. त्यात जर शिपाई आणि इतर कामगार जनगणनेच्या कामासाठी गेल्याने शाळांच्या दैनंदिन कामकाजावर मोठा ताण पडत आहे.

# रिसॉर्टच्या तरणतलावात बुडून ७ वर्षीय मुलाचा मृत्यू

**विरार-** नवापूर येथील एका रिसॉर्टमधील तरणतलावात बुडून ७ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. लवीत यादव असे या मयत मुलाचे नाव असून तो मुंबईत राहणारा होता.


भांडूपमध्ये राहणारे रामलाल यादव हे रविवारी सकाळी आपल्या नातवंडांना घेऊन विरारच्या अर्नाळा जवळील नवापूर येथील 'मंथन रिसॉर्ट' येथे सहलीसाठी आले होते. दुपारी जेवणानंतर तीनच्या सुमारास सर्व मुले रिसॉर्टमधील तरणतलाव (वेव्ह पूल) मध्ये खेळत होती. खेळत असतानाच अचानक ७ वर्षांचा लवीत हा पाण्यात बुडू लागला. हा प्रकार लक्षात येताच रिसॉर्टच्या जीवरक्षकांनी त्याला तातडीने पाण्यातून बाहेर काढले. त्यानंतर तातडीने उपचारासाठी विरार येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले.

# ४,११६ कोटींच्या नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला हिरवा कंदील

**उत्तर महाराष्ट्राला मोठा सिंचन दिलासा**

■ जळगाव

**उत्तर महाराष्ट्रातील** पाणी सुरक्षिततेसाठी मोठा दिलासा देणाऱ्या महत्त्वाकांक्षी नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाच्या अंमलबजावणीला राज्याच्या जलसंपदा विभागाने मंजुरी दिली असून ४,११६ कोटी रुपयांच्या कामाचे आदेश जारी करण्यात आले आहेत. मंत्री गिरीश



महाजन यांनी ही माहिती देताना हा प्रकल्प उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या दीर्घकालीन समस्यांवर मोठा उपाय ठरेल असे सांगितले.

अनियमित पाऊस, वारंवार दुष्काळ आणि पाण्याची कमतरता अशा समस्यांना अनेक दशकांपासून सामोरे जाणाऱ्या उत्तर महाराष्ट्रासाठी हा प्रकल्प 'गेमचेंजर' ठरणार असल्याचे मानले जात आहे.या प्रकल्पाचे कंत्राट नाशिक येथील गिरणा व्हॅली प्रकल्प विभागामार्फत मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड आणि आयसीसी इन्फ्राटेक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त उपक्रमाला देण्यात आले आहे.

# कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्यावर बीडमध्ये हिंदू जनआक्रोश मोर्चा

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील विविध घटनांच्या निषेधार्थ नेकनूर येथे सोमवारी हिंदू जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. माजी सैनिकाला झालेली मारहाण, अल्पवयीन मुलीवरील अत्याचार, जबरदस्ती धर्मांतराचे कथित प्रयत्न तसेच नेकनूर परिसरातील हल्ल्याच्या घटनेच्या निषेधार्थ हा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

मोर्चाला आमदार महेश लांडगे आणि संग्राम जगताप यांची उपस्थिती होती. मोर्चानंतर आयोजित सभेमध्ये विविध वक्त्यांनी कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावर प्रशासनावर टीका करत कठोर कारवाईची मागणी केली. सभेत बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी पोलिस प्रशासनाने घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे सांगितले.

ते म्हणाले की, पोलीस प्रशासनाला आजच सांगतो. २६ तारीखला बैल कापला गेला तर २७ तारीखला इथे आम्ही येऊ. तुम्ही जरा खबरदारी घ्या.

# एसटी दरवाढ तूर्तास नाही! प्रताप सरनाईकांची माहिती

■ मुंबई

**डिझेल** दरवाढीमुळे कोट्यावधींचा अतिरिक्त भार एसटी महामंडळावर पडत आहे. त्यामुळे आता एसटी बस तिकीट दरातही वाढ होणार का? याबाबत चर्चा सुरू असतानाच पुढील काही दिवस तरी एसटी तिकीट दरवाढीचा निर्णय घेतला जाणार नसल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्रालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत दरवाढीच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाली. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सरनाईक म्हणाले की, एसटीला १० लाख ८७ हजार लिटर डिझेल लागते. इंडियन ऑईल कडून डिझेलचा पुरवठा होत आहे. मागील आठवड्यात ३ रुपयांनी दरवाढ झाली आहे. त्यामुळे आम्हाला ३३ लाख ७० हजार रुपये अधिक मोजावे लागत आहेत. यामुळे महामंडळाला वर्षाला १२४ कोटींचा तोटा सहन करावा लागत आहे. जागतिक पातळीवर युद्धाची परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा आणखी परिणाम होऊ शकतो. पंतप्रधानांनीही याबाबत आवाहन केले आहे. भविष्यात काय होईल, हे सध्या सांगता येत नाही. विशेष सवलत देण्याचा निर्णय झाल्यास आम्ही दरवाढ करणार नाही. उद्या होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री यांना यासंदर्भात पत्र देण्यात येणार आहे.

# आयपीएल स्पर्धेतील क्रिकेटपटूंच्या विमानासाठी बेसुमार इंधन का वापरता?

पान १ वरून

७ ते ८ हजार लिटरवर जातो. प्रत्येक संघाने दहा ठिकाणी प्रवास केला तर एकेका संघाकडून ५० ते ६० हजार लिटर इंधन खर्च केले जाते. सध्याच्या परिस्थितीत इंधनाचा एवढ्या मोठ्या प्रमाणावर वापर करणे देशहिताचे नाही. त्यामुळे आयपीएलचा उर्वरित कार्यक्रम नव्याने आखण्याचे निर्देश आयोजकांना द्यावेत, अशी विनंती गोयल यांनी पत्राद्वारे केली आहे.

विशेष म्हणजे, नुकतीच पाकिस्तानात पाकिस्तान सुपर लीग ही स्पर्धा पार पडली. काटकसरीच्या कारणास्तव या स्पर्धेतही बदल करण्यात आला. या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा रद्द करण्यात आला. नियोजित सहा शहरांऐवजी फक्त दोन शहरांतच सगळे सामने खेळवण्यात आले. हे सामने प्रेक्षकांशिवायच खेळवले गेले. आता या स्पर्धेत अंतिम सामन्यासह एकूण १२ सामने शिल्लक आहेत. यामध्ये ८ साखळी सामने आणि ४ प्लेऑफ सामन्यांचा समावेश आहे. 'सीटीआय'च्या या पत्राला क्रीडामंत्री कसा प्रतिसाद देतात आणि आयपीएलचे सामने काही ठिकाणी व खरोखरच प्रेक्षकांविना खेळवले जातील का, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# मुंबई विमानतळ कर्मचाऱ्यांचा संप
## एअर इंडियाची उड्डाणे रखडली

■ मुंबई

**मुंबईतील** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील कर्मचाऱ्यांनी आज अचानक संप पुकारल्याने एअर इंडियाची अनेक उड्डाणे विलंबाने झाली. सुमारे पंधरा उड्डाणे दीड ते दोन तास उशिराने झाली, असे सांगण्यात आले.

मुंबई विमानतळावर एआय एअरपोर्ट सर्व्हिसेस लिमिटेड (एआय एएसएल) ही सरकारी मालकीची कंपनी ग्राउंड हँडलिंग कंपनी म्हणून काम पाहते. या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी पगारवाढ आणि अन्य मागण्यांसाठी अचानक काम बंद आंदोलन सुरू केले. त्यामुळे अनेक उड्डाणे रखडली. तसेच बाहेरून आलेल्या प्रवाशांना दीड-दोन तास विमानातच थांबून रहावे लागले. यामध्ये हैदराबादहून मुंबईला आलेल्या एअर इंडियाच्या विमानाचा समावेश आहे. या विमानाचे आज सकाळी ११.४५ वाजता विमानतळावर आगमन झाले.



# क्रिती-रश्मिकावर शाहीदचा कौतुकवर्षाव

'कॉकटेल २' चित्रपटाच्या संगीत अनावरणाचा दिमाखदार सोहळा नुकताच पार पडला. या कार्यक्रमाला अभिनेता शाहिद कपूर, अभिनेत्री क्रिती सॅनन, रश्मिका मंदाना, चित्रपट निर्माते दिनेश विजान व लव रंजन, दिग्दर्शक होमी अदजानिया आणि संगीतकार प्रितम चक्रवर्ती उपस्थित होते. या सोहळ्यात चित्रपटातील दोन नवीन गाणी प्रदर्शित करण्यात आली असून त्यात शाहिद आणि क्रिती यांच्यावर चित्रित झालेले 'माशुका' आणि शाहिद व रश्मिका यांच्यावर चित्रित झालेले 'तुझको' या गाण्यांचा समावेश आहे. कार्यक्रमादरम्यान शाहिद कपूरने दोन्ही अभिनेत्रींचे भरभरून कौतुक केले. क्रिती आणि रश्मिका या दोघी अत्यंत व्यावसायिक आणि त्यांच्या कारकिर्दीच्या सर्वोच्च शिखरावर असलेल्या उत्कृष्ट अभिनेत्री व सुपरस्टार आहेत, असे शाहिद म्हणाला. या दोघींनीही चित्रपटात अप्रतिम अभिनय केला असून त्या अतिशय सुंदर दिसत आहेत, म्हणूनच चित्रपटातील त्याचे 'कुणाल' नावाचे पात्र या दोघींपैकी कोणाची निवड करावी या संभ्रमात असते आणि हीच या चित्रपटाची मूळ कथा आहे, असेही त्याने नमूद केले. रश्मिका सोबतचा हा आपला पहिलाच चित्रपट असूनही चित्रीकरणादरम्यान त्यांच्यात कमालीची उत्स्फूर्तता होती, अशी आठवण त्याने शेअर केली. हा बहुप्रतिक्षित चित्रपट १९ जून रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असून, २९ मे रोजी या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.



# अजय-अनुभवचे पॅचअप!

बॉलिवूड सुपरस्टार अजय देवगण आणि प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक अनुभव सिन्हा तब्बल १८ वर्षांनंतर एका मोठ्या बजेटच्या ॲक्शन चित्रपटासाठी एकत्र येणार आहेत. २००७ मधील 'कॅश' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाल्यानंतर या दोघांमध्ये कोणताही संपर्क नव्हता, मात्र आता त्यांच्यातील दुरावा संपला आहे. अनुभव सिन्हा यांनी स्पष्ट केले होते की, त्यांच्यात वैयक्तिक असा कोणताही वाद नव्हता, तर तो मतभेद चित्रपटाचे निर्माते आणि फायनान्सर्स यांच्यात होता. प्रसिद्ध निर्माते कुमार मंगत यांनी या दोघांमधील दुरावा मिटवण्यासाठी पुढाकार घेतला. काही महिन्यांपूर्वी कुमार मंगत यांनी या दोघांची भेट घडवून आणली. या भेटीत अनुभव सिन्हा यांनी अजय देवगणला एक स्क्रीप्ट ऐकवली. अजय देवगण, कुमार मंगत आणि निर्माते भूषण कुमार यांना ही कथा प्रचंड आवडली असून भूषण कुमार या चित्रपटाची निर्मिती करण्याची शक्यता आहे. हा चित्रपट अनुभव सिन्हा यांच्या पूर्वीच्या 'दश' (२००५) किंवा 'रा वन' (२०११) या चित्रपटांसारखाच एक भव्य आणि मनोरंजक ॲक्शनपट असेल.

# अनुराग कश्यप अडचणीत



प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक आणि अभिनेते अनुराग कश्यप यांच्या अडचणीत वाढ झाली असून, ब्राह्मण समाजाविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह टिप्पणी केल्याच्या आरोपावरून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश सुरत न्यायालयाने दिले आहेत. सुरतमधील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ए. एस. जानी यांच्या न्यायालयाने हा आदेश दिला आहे. तक्रारीनुसार, गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात 'फुले' या हिंदी चित्रपटाच्या ट्रेलरच्या प्रकाशनावरून झालेल्या वादादरम्यान अनुराग कश्यप यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर ब्राह्मण समाजाला लक्ष्य करत आक्षेपार्ह टिप्पण्या केल्या होत्या. तसेच, या विधानांना विरोध करणाऱ्या युजर्सना उत्तर देतानाही त्यांनी अशाच प्रकारची विधाने चालू ठेवली होती. तक्रारदाराने जानेवारी २०२० मधील त्यांच्या एका जुन्या सोशल मीडिया पोस्टचाही उल्लेख केला आहे, ज्यामध्ये त्यांनी केंद्र सरकारवर टीका करताना हिंदू धर्मीयांबद्दल आक्षेपार्ह शब्द वापरल्याचा आरोप आहे. न्यायालयाने प्राथमिक निरीक्षणात नोंदवले की, कश्यप यांच्या विधानांमुळे विशिष्ट समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असण्याची आणि सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दोन गटांमध्ये शत्रुत्व निर्माण करणे, सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या उद्देशाने जाणूनबुजून अपमान करणे आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवणे याशी संबंधित कलमांखाली गुन्हा नोंदवण्याचे निर्देश सुरत पोलिसांनी देण्यात आले आहेत.

# मनमोकळी कियारा



प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री कियारा अडवाणी हिने अलीकडेच एका मुलाखतीत तिने तिच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे टप्पे, आगामी चित्रपट, वैयक्तिक आयुष्य आणि नुकतेच आलेले मातृत्व याविषयी मनमोकळा संवाद साधला. चित्रपटांमधील महिला पात्रांच्या महत्त्वावर बोलताना कियारा म्हणाली, मला पडद्यावर 'मॅचो मॅन' पाहायला आवडतात, पण केवळ तेच नकोत. चित्रपटांमध्ये 'वूमन एनर्जी' असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण स्त्रिया कथेमध्ये एक अशी भावनिक खोली आणि संवेदनशीलता आणतात, ज्याचा आस्वाद पुरुष प्रेक्षकही तितक्याच आवडीने घेतात. 'टॉक्सिक: अ फेरीटेल फॉर ग्रोऊन-अप्स' या आगामी चित्रपटाविषयी बोलताना कियारा म्हणाली की, हा चित्रपट स्त्री-पुरुषांच्या पारंपरिक संबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलून टाकेल. आपल्या सुरुवातीच्या प्रवासाचा आठवण काढताना तिने सांगितले की, २०१८ मधील 'लस्ट स्टोरीज' हा तिच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा टर्निंग पॉईंट होता. त्यावेळी तिने महिला सक्षमीकरण किंवा रूढी परंपरा मोडण्याच्या विचाराने तो चित्रपट केला नव्हता, तर करण जोहरसोबत काम करण्याची उत्तम संधी म्हणून त्याकडे पाहिले होते. मात्र, आज मागे वळून पाहताना तो एक अत्यंत धाडसी निर्णय होता, ज्याने तिला इंडस्ट्रीमध्ये एक अभिनेत्री म्हणून ओळख मिळवून दिली. गतवर्षीच्या 'मॅट गाला' पदार्पणाच्या वेळची एक आठवण शेअर करताना तिने सांगितले की, त्या ऐतिहासिक रेड कार्पेटवर ती गरोदर होती. तिची मुलगी सराय्या पोटात असताना तिला फुटबॉलसारख्या लाथा मारत होती, पण त्या रात्री ती खूप शांत होती. मोठी झाल्यावर ती आपल्या मुलीला अभिमानाने सांगेल की त्या रात्री त्या दोघी एकत्र तिथे होत्या.



# 'टॉक्सिक'च्या विलंबाबाबत यशचे खुलासे

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता यश याने आपल्या आगामी 'टॉक्सिक' चित्रपटाबद्दल आणि त्याच्या प्रदर्शनाला होणाऱ्या विलंबाबद्दल महत्त्वपूर्ण खुलासे केले आहेत. एका विशेष मुलाखतीत त्याने या चित्रपटाची निवड करण्यामागचे कारण आणि हॉलीवूडच्या वितरण मॉडेलशी सुसंगत असलेली त्याची प्रदर्शन योजना यावर प्रकाश टाकला.

गेल्या वर्षभरात या चित्रपटाचे प्रदर्शन दोनदा पुढे ढकलण्यात आले आहे. या विलंबामागचे कारण स्पष्ट करताना यशने सांगितले की, हॉलिवूड पद्धतीनुसार चित्रपट पूर्ण झाल्यावरच त्याचे मार्केटींग सुरू व्हायला हवे, परंतु येथे चित्रीकरण सुरू होताच त्याबद्दल लिहिले जाऊ लागते. चित्रपटात मोठी गुंतवणूक असल्यामुळे, तो खरेदी करणार्यांना किंवा त्याचा भाग होऊ इच्छिणाऱ्यांना आधी पूर्ण चित्रपट पाहायचा असतो. 'टॉक्सिक' हा चित्रपट आधी ४ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार होता, मात्र आता प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली असून चित्रपटाच्या नव्या प्रदर्शन तारखेची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही.

# 'चांद मेरा दिल'चा मार्ग मोकळा; पण...

अभिनेता लक्ष्य आणि अभिनेत्री अनन्या पांडे यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'चांद मेरा दिल' या आगामी चित्रपटाला केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने म्हणजेच सेन्सॉर बोर्डाने 'यू/ए १६+' प्रमाणपत्र दिले आहे. मात्र, हे प्रमाणपत्र देण्यापूर्वी सेन्सॉर बोर्डाने चित्रपटामधील ९६ सेकंदांचे म्हणजेच १ मिनिट ३६ सेकंदांचे चुंबन दृश्य कापण्याचे आदेश निर्मात्यांना दिले आहेत. या बदलांमध्ये बोर्डाने सुरुवातीला १० सेकंदांचे चुंबन दृश्य वगळून त्याजागी योग्य दृश्य टाकण्यास सांगितले आहे. तर दुसर्या मोठ्या बदलामध्ये तब्बल १ मिनिट २६ सेकंदांचे 'लिप लॉक' चुंबन दृश्य पूर्णपणे काढून टाकण्याची सूचना केली आहे. याशिवाय चित्रपटामध्ये काम केलेल्या सर्व बालकलाकारांचे संमती पत्र सादर करण्याचे निर्देशही निर्मात्यांना देण्यात आले आहेत. सेन्सॉर प्रमाणपत्रानुसार 'चांद मेरा दिल' या चित्रपटाची एकूण लांबी १३५.३६ मिनिटे म्हणजेच २ तास १५ मिनिटे आणि ३६ सेकंद इतकी आहे.



## बदलापूर अत्याचार प्रकरणातील पीडित मुलींचा शैक्षणिक खर्च शासन करणार

■ बदलापूर

**बदलापुरात** ऑगस्ट २०२४ मध्ये राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या शाळा अत्याचार प्रकरणातील पीडित मुलींच्या वडिलांनी शासनाकडून फी भरली जात नसल्याचा आरोप केल्यानंतर प्रशासन जागे झाले. पालकांच्या इच्छेनुसार दोन्ही मुलींना पसंतीच्या शाळेत प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेश शुल्कासह शिक्षणाचा संपूर्ण खर्च शासन थेट संबंधित शाळांना देणार आहे.

निर्भया क्रमांक १ चे पहिली ते दहावीपर्यंतचे संपूर्ण शुल्क शासन भरणार आहे, तर निर्भया क्रमांक २ चे सीनिअर केजी ते दहावीपर्यंतचा सर्व शैक्षणिक खर्च शासनाकडून करण्यात येणार आहे. शुल्क वेळेत शाळांकडे जमा होण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये बदलापूर पूर्वेतील आदर्श विद्यालय या शाळेत घडलेल्या या घटनेने संपूर्ण राज्य हादरले होते. शाळेतील शिपाई म्हणून काम करणाऱ्या आरोपी अक्षय शिंदेने चार आणि सहा वर्षांच्या दोन चिमुरड्यांवर अत्याचार केल्याचा आरोप होता.

## पाणीगळती रोखण्यासाठी परदेशी तंत्रज्ञान वापरणार

■ मुंबई

**मुंबई** शहरातील हजारो दशलक्ष लीटर वाया जाणाऱ्या पाण्याच्या गळतीचा अचूक शोध घेण्यासाठी महापालिका प्रशासन आता परदेशी तंत्रज्ञान वापरणार आहे. जपान, ब्रिटनसह इतर देशांतील अत्याधुनिक प्रगत सेन्सर, हेलियम गॅस, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल ट्विन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणारी प्रमुख सात धरणे ही ठाणे जिल्ह्यात आहेत. त्या ठिकाणांहून थेट मुंबईपर्यंत जलवाहिन्या टाकल्या आहेत. या जलवाहिन्यांची देखभाल

**पालिका प्रशासन निविदा मागविणार**

करणे मोठे जिकिरीचे असते. गळती होत असलेल्या ठिकाणी काही लोक आणखी भगदाड पाडून पाण्याची चोरी करतात. त्यामुळे पाणी गळती आणि



चोरी अशा दुहेरी संकटामुळे दररोज ७५५ दशलक्ष लीटर पाणी वाया जाते.

वाया जाणारे पाणी रोखण्यासाठी महापालिकेकडून या जलवाहिन्या मजबूत करण्यासाठी परदेशी तंत्रज्ञान वापरण्याचा निर्णय घेतला असून, या कामात तरबेज असणाऱ्या फ्रान्स, जपान,ब्रिटन,मलेशिया आणि सिंगापूर आदी परदेशी कंपन्यांकडून पालिका लवकरच निविदा मागविणार आहे.

## नागपुरात महाल परिसरात पुन्हा थरार! मध्यरात्री गोळीबार

■ नागपूर

**नागपूर** शहरात पुन्हा एकदा गोळीबाराची घटना घडली. शहराच्या मध्यवर्ती भागातील महाल परिसरातील कोठी रोड येथे रात्री उशिरा सहा जणांनी दोन राऊंड फायरिंग करत परिसरात दहशत पसरवली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार नोंद करण्यात आली आहे. रात्री साडेअकरा ते बारा वाजण्याच्या सुमारास तीन दुचाकींवरून सहा जण कोठी रोड परिसरात आले. आरोपींनी अचानक दोनदा गोळीबार केला. त्यानंतर ते घटनास्थळावरून पसार झाले. गोळीबाराचा आवाज ऐकून महाल परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात तक्रारदाराने दोन जणांवर गोळीबार केल्याचा आरोप केला. संशयित आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याची माहिती आहे. त्यांच्यावर अमली पदार्थ विक्री आणि बाळगण्याचे गुन्हे यापूर्वीही त्यांच्यावर दाखल आहेत. आरोपींमधील अंतर्गत वादातूनच हा गोळीबार झाल्याचा पोलिसांना संशय आहे. ही घटना नागपूरमधील संघ कार्यालयापासून अवघ्या दीड किमी अंतरावर घडल्याने शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## गडचिरोलीत बनावट नोटांचे रॅकेट इंजिनिअर भावंडांसह चौघांना अटक

■ गडचिरोली

**गडचिरोली** पोलिसांनी कारवाई करत आंतरजिल्हा बनावट नोटा रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणाची पाळेमुळे थेट नागपूरपर्यंत पोहोचली असून, दोन अभियंता भावंडांनी भाड्याच्या फ्लॅटमध्ये अत्याधुनिक साधनांच्या मदतीने बनावट नोटांची छपाई सुरू होती. ११ मे रोजी कारगिल चौक परिसरातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएममध्ये शंभर रुपयांच्या २१ नोटा जमा करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, मशीनने या



नोटा स्वीकारण्यास नकार दिला. त्यानंतर बँकेकडून करण्यात आलेल्या पडताळणीत त्या सर्व नोटा बनावट असल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी बँकेचे व्यवस्थापक प्रतीक अनासाने यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान प्रमोद टिकाराम कोवे (२३) यांच्या खात्यात या नोटा जमा करण्याचा प्रयत्न झाल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्यानंतर त्याने ही रक्कम गडचिरोलीतील पानटपरी चालक आदित्य रेचनकर (१९) याच्याकडून घेतल्याची माहिती दिली.

## भारतीय रत्ने व दागिन्यांची निर्यात ९.०७ टक्क्यांनी घसरली

■ मुंबई

**पश्चिम** आशियातील संघर्ष, जागतिक मागणीतील घट आणि अमेरिकेच्या आयात शुल्कातील अनिश्चिततेमुळे भारतीय रत्ने व दागिन्यांची निर्यात नुकतीच ९.०७ टक्क्यांनी घसरली आहे. मागणीतील या घसरणीमुळे एकूण निर्यात २.२२ अब्ज अमेरिकन डॉलर्स म्हणजे सुमारे २०,८२५ कोटी रुपये इतकी मर्यादित राहिली आहे, अशी माहिती रत्न आणि आभूषण निर्यात प्रोत्साहन परिषदेचे अध्यक्ष किरीट भन्साळी यांनी दिली. किरीट भन्साळी यांनी सांगितले की, ही निर्यातीतील घसरण प्रामुख्याने पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे झाली आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर अडथळे निर्माण होऊन निर्यातीवर परिणाम झाला आहे. भू-राजकीय तणावाव्यतिरिक्त, रत्न आणि आभूषण उद्योगासाठी मुख्य बाजारपेठ असलेल्या अमेरिकेतील निर्यातीवरही परिणाम झाला आहे, कारण तेथील शुल्काबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता नाही.

## इंडिगोच्या विमानात अर्धा तास एसी, लाईट बंद! प्रवाशांचे हाल

■ अहमदाबाद

**उड्डाणाच्या** तयारीत असलेल्या इंडिगोच्या एका विमानात ऐनवेळी तांत्रिक दोषामुळे वीजपुरवठा खंडित झाला. विमानातील एसी आणि लाईट बंद झाल्याने सुमारे अर्धा तास प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. प्रचंड उकाड्याने हैराण झालेले प्रवासी हाती लागेल त्या वस्तूंचा पंख्यासारखा वापर करत होते.

इंडिगोचे बडोद्याहून दिल्लीला जाणारे ६ई६५७ हे विमान रनवेवर असताना अचानक विमानाच्या ग्राउंड पॉवर युनिटमध्ये (जीपीयू) बिघाड झाला. त्यामुळे विमानातील वीजपुरवठा खंडित झाला. विमानातील सर्व लाईट आणि एसी बंद झाले. मिट्ट काळोखात प्रचंड उकाड्याने प्रवासी कासावीस झाले. काल रात्री ८.५० ते ९.१५ या वेळेत हा प्रकार घडला. एका प्रवाशाने विमानातील या घटनेचे व्हिडिओ चित्रण केले. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. विमान जेव्हा विमानतळावर नुसते उभे असते तेव्हा त्याचे मुख्य इंजिन बंद केले जाते. त्यानंतर जीपीयूमधून विमानातील लाईट, एसी आदि उपकरणे चालवली जातात. या जीपीयूमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ही परिस्थिती ओढवली. विमानतळावरील अभियंत्यांनी तत्काळ विमानाचा ताबा घेत विमानाचा वीजपुरवठा पुर्ववत सुरू केला, तेव्हा प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

## नाशकात गोदा काठ परिसरात दोन महिने 'प्रवेश बंदी' लागू

■ नाशिक

**आगामी** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी आणि 'रामकाल पथ' प्रकल्पांतर्गत घाट परिसराच्या विकासासाठी नाशिक महापालिकेने गोदावरी काठावर होळकर पूल ते दुतोंड्या मारुती परिसरदरम्यान २ महिन्यांसाठी प्रवेश बंदी लागू केली आहे.१६ मे ते १६ जुलै या कालावधीत ही प्रवेश बंदी राहणार आहे.

या प्रवेश बंद काळात अस्थी विसर्जन आणि पूजाविधीसाठी मात्र कोणतीही मनाई करण्यात आलेली नाही. सर्व दशक्रिया विधी व अन्य धार्मिक कार्य लगतच्या यशवंत महाराज पटांगण व भाजी पटांगण येथे उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या शेडमध्ये केले जातील. तसेच स्नान आणि पिंडदानासाठी गांधी तलाव, तर अस्थी विसर्जनासाठी अस्थीकुंड येथे व्यवस्था करण्यात आली आहे. यासंदर्भात पालिका प्रशासन व पुरोहित संघ यांच्यात नुकतीच बैठक झाली.या बैठकीत रामकुंड परिसरात विविध सुधारणा करण्यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली.

## विक्रोळीच्या बोगद्यात ३५० टन वजनाचे भव्य कटरहेड दाखल!

**मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाला वेग**

■ मुंबई

**मुंबई-अहमदाबाद** बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामाला आता दिवसेंदिवस वेग येऊ लागला आहे. आता तर विक्रोळीमध्ये पहिल्या टनेल बोरिंग मशीनचा पहिला भव्य कटरहेड यशस्वीपणे बोगद्यात उतरवण्यात आला आहे. १३.६ मीटर व्यासाचे आणि ३५० टन वजन असलेले हे भव्य कटरहेड, हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर प्रकल्पासाठी महत्त्वाचा टप्पा



आहे. हे कटरहेड देशातील अत्याधुनिक अभियांत्रिकी क्षमतेचे प्रतिक मानले जात आहे.


हे टनेल बोरिंग मशीनचे मुख्य अंग असून या प्रक्रियेमुळे देशातील पहिल्या समुद्राखालील रेल्वे बोगद्याच्या खोदकामाला वेग आला आहे. सुमारे २५० प्रवासी कार्सइतके वजन असलेला हा कटरहेड, भारतातील रेल्वे बोगद्याच्या कामात वापरला जाणारा आतापर्यंतचा सर्वात मोठा कटरहेड आहे. हे महाकाय मशीन वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स ते विक्रोळी दरम्यानच्या सुमारे १६ किलोमीटरच्या बोगद्याचे खोदकाम करेल. या २१ किमी लांबीच्या पट्ट्यामध्ये ठाणे खाडीखालील ७ किमीचा भारतातील पहिला समुद्राखालील रेल्वे बोगदा समाविष्ट आहे.

## पाणी साठवण्याच्या खड्ड्यात बुडून दोन चिमुकल्यांचा मृत्यू

■ लातूर

**लातूरमधील** बोधेनगर परिसरात पाणी साठवण्यासाठी तयार केलेल्या खड्ड्यात बुडून दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाला. दोन्ही मुले घराबाहेर खेळत असताना जवळच असलेल्या पाणी साठवण्याच्या खड्ड्यात पडली. बराच वेळ मुले दिसत नसल्याने कुटुंबियांनी परिसरात शोध घेतला. शोधादरम्यान दोघेही खड्ड्यात आढळून आले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ त्यांना बाहेर काढून शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले. नागरिकांनी अशा उघड्या व असुरक्षित खड्ड्यांवर योग्य सुरक्षेची उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१६१०



**आडवे शब्द –**

२. त्रागा, चिडचिड ६. बोलाचाली, भांडण ८. पशू ११. उदरनिर्वाह १२. उपासमार होणे १४. नृत्य १५. कुंपण १६. भाजून काढणारे, तप्त १८. पुराणातील एक अप्सरा २०. ओलसर, आर्द्र (हिं.) २२. मापण्याचे एक साधन २४. राजसेविका २५. उद्यानंतरचा दिवस २६. विपर्यास, गैरअर्थ २८. विरोध २९. गुरांचे अन्न ३०. रोगप्रतिबंधक औषध ३२. गाढव ३५. अधोगती झालेला ३६. पार्वती ३८. रागावलेला ३९. शरीर ४०. कमी ४१. खड्ग ४३. धूम्रपानाचा एक जुना प्रकार ४४. बाजू, कैवार ४५. नारायण श्रीपाद राजहंस यांचे रंगभूमीवरील नाव ४७. जमीन ४८. वाळा ४९. धोशा, लकडा ५०. दुसऱ्यासाठी घेतलेला त्रास ५२. रिक्त, रिकामा ५३. नवीन ५४. आशीर्वाद ५८. वस्त्राचा स्पर्शगुण ५९. ओल ६०. हिंमत ६२. खोडकर ६३. प्रयत्न ६५. लोभी ६६. रोमांच ६७. कुर्ता ६९. शंभर ७०. विनय, संकोच ७२. दम लागणे ७३. सोटा ७४. नौदल ७७. देवळातील मूर्ती ठेवलेला भाग ७९. अंत, मर्यादा ८०. सर्प ८१. पारा ८४. धमकी ८५. गज ८६. उपयोगात आणणे ८८. छपराला आधार देणारा खांब ९०. रंक ९२. अनुमोदन करणारे विधान, पुरवणी ९६. भूमितीतील व्याख्येनुसार दोन बिंदू जोडणारी ९८. आंदोलन ९९. वर्ष, संवत्सर १००. तावडीत येणे १०२. लोकर देणारा प्राणी १०४. चातुर्य, हुशारी १०५. पलायन १०६. मेघगर्जना

**उभे शब्द –**

१. भलेपणा, सभ्य वागणूक २. कारखान्यातील धूर बाहेर जाण्यासाठी केलेली सोय ३. उत्सव ४. सराईतपणे ५. बाहेरचा, परका ६. अभिमानी ७. लहान मूल ९. विविध १०. आश्वासन १३. प्रथा १७. धीर सुटलेला १९. बाणासारखे परंतु मोठे आणि हाताने फेकून मारले जाणारे शस्त्र २१. ढगांमुळे दाटलेला अंधार २३. पाहुणा २५. वाणीची पहिली अवस्था २७. कणिक मळण्यासाठीचे पसरट भांडे २९. लांब शेपटी व तुरा असलेला मैनेच्या आकाराचा हा पक्षी पाणथळ जागी राहतो ३१. भरतीची वेळ ३३. लग्नात अग्नीभोवती प्रदक्षिणा घालण्याचा विधी ३४. अरण्य ३६. घर ३७. कोर्टात केलेला अर्ज ३८. मान्य केलेले ३९. हौदा, हत्तीच्या पाठीवरील आसन ४०. उरलेले ४२. राखण ४६. भागिरथी, काशीसह अनेक तीर्थक्षेत्रे हिच्या काठावर वसली आहेत ४९. गुप्तपणे माहिती काढणारा ५१. सज्जन ५३. दसऱ्याला सांगता होणारे व्रत ५४. घरातील ज्येष्ठ ५५. खाल्ल्या मिठाला न जागणारा ५६. गूढ, रहस्य ५७. बावळट ५८. उदर ५९. आवेश, अवसान ६१. अल्प ६३. नाराज ६४. साडीचे टोक, शेव ६५. हस्त ६६अ. चहा प्यायचे भांडे ६८. बळजबरी ६९. बाण ७१. घोडशाळा, तबेला ७४. पीडा, संकट ७५. धांडोळा, खाणाखुणांवरून घेतलेला शोध ७६. पाणी, जल ७८. टिप्पणी ८०. नैसर्गिक, तर्कसंगत ८१. झाडाभोवतीचा कट्टा ८२. औषध ८३. सुवर्णमृगाचे रूप घेणारा राक्षस ८७. प्रतिध्वनी ८९. सगळे ९१. मजबूत ९२. भेकड ९३. शकुनवंती, एक मंगलवाद्य ९४. खोडकर ९५. मांडव ९७. गर्व, अहंपणा ९९. उजळणी, अभ्यास १०१. धनुष्य १०३. रास •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६०९ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. मामुली ३. भुजा ४. अलाहिदा ७. हंगाम १०. तक्ता ११. होम १३. वाकडा १५. वज्रपात १७. बाष्प १८. कासावीस २२. ग्रोस २३. टाप २४. ताई २६. दात विचकणे २८. रक्त २९. खातरजमा ३०. टक ३२. शैल ३३. पुरातन ३४. प्रस्थ ३६. सौदामिनी ४०. हेवा ४१. अंधकार ४३. तलवार ४५. तीर्थ ४६. चक्रम ४८. सीमित ५१. मढ ५२. बक ५३. नत ५६. साहस ५८. पीत ६०. जीवघेणा ६२. धरती ६३. मनन ६५. समज ६७. करणी ६८. लहानसहान ७०. कालिया ७१. गतकाल ७४. शुष्क ७५. दंत ७६. नवमी ७८. आभरण ८०. झाड ८१. मैना ८२. तमा ८३. लालसा ८४. कुलूप ८६. कसा ८८. लाल ८९. हीन ९०. अंकुरित ९२. रद्दी ९३. मराठी ९४. ताकद ९६. वितान ९७. फारकत ९९. नेसू १००. सवाई १०२. भाव १०३. सहमत १०५. तळीराम १०६. खारीक १०७. तगमग १०८. माशी

**उभे शब्द :** १. मात २. मुक्ताबाई ३. भुमका ५. लाख ६. दावा ७. हंडा ८. मवसर ९. फुपाटा १२. रवी १४. कलकत्ता १६. तपशीलवार १९. सामंजस्य २०. सदा २१. नाविक २४. ताकापुरती आजी २५. जतन २७. तटस्थ २९. खातमा ३१. सौदा ३४. प्रवासी ३५. क्रोध ३६. सौर ३७. मित ३८. नीलम ३९. चक्र ४१. अंत ४२. काडी ४४. वाढपी ४६. चकणा ४७. मनधरणी ४९. मिथ्या ५०. प्रहसन ५२. बघे ५४. तरणी ५५. अननस ५७. सम ५९. तया यातना कठीण ६१. वरात ६३. महा ६४. नस ६६. जकात ६८. लष्कर ६९. हाड ७१. गळ्यातला ताईत ७२. कान ७३. लवलाही ७४. शुभशकून ७५. दंडक ७७. मीलन ७९. वेलू ८२अ. मालक ८५. परत ८७. सामसूम ९०. अंताक्षरी ९१. तफावत ९५. दसरा ९८. कलम ९९. नेहमी १०१. वाम १०४. तमा

# शिवराज मोटेगावकर यांना अटक

पान १ वरून

कार्यालयात जाऊनही विविध माहिती आणि नोंदी गोळा केल्या. शिवराज मोटेगावकर याची शुक्रवारी तब्बल ११ तास चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर, काल त्यांच्या ट्युशनमध्ये सीबीआयचे पथक दाखल झाले होते. या कारवाईदरम्यान अनेक कागदपत्रे, संगणक आणि मोबाईल फोन ताब्यात घेण्यात आले होते. आज सकाळी त्यांना अटक करण्यात आली. सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांना ताब्यात घेतल्यानंतर ही मोठी कारवाई मानली जात आहे. सीबीआय पथकाने आजही आरसीसीच्या कार्यालयात तपासणी केली. या संपूर्ण कारवाईबाबत मोठ्या प्रमाणात गुप्तता पाळण्यात येत आहे. लातूर येथील ट्युशन एरियामध्ये मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

दरम्यान मोटेगावकर याचा काही दिवसांपूर्वीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ या वर्षीची नीट परीक्षा संपल्यानंतरचा आहे, त्यात मोटेगावकर परीक्षा देऊन आलेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दिसत आहेत. ते विद्यार्थ्यांना विचारत आहेत की, आरसीसीच्या मॉक टेस्ट सिरीजमधून प्रश्न आले होते का? यावर उत्तर देताना एक विद्यार्थी म्हणतो की सर, तुम्ही जे १०१ प्रश्न दिले होते, त्याच प्रश्नांमधून परीक्षेत प्रश्न आले होते. यावर मोटेगावकर अत्यंत आत्मविश्वासाने, आरसीसीचे पेपर मोर दॅन सफिशियंट आहेत, असे सांगतो.

दरम्यान, पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणून पुण्यातील सीबीआय कार्यालयात तीन संशयित विद्यार्थ्यांची चौकशी करण्यात येत आहे. हे तिन्ही संशयित विद्यार्थी आज पुण्याच्या सीबीआय कार्यालयात हजर झाले होते. कार्यालयाबाहेर आलेल्या एका सीबीआय अधिकाऱ्याने त्यांची समन्स नोटीस तपासली आणि त्यानंतर त्यांना चौकशीसाठी आत नेण्यात आले. सीबीआय कार्यालयात दाखल झालेले तिघेही जण ओळख लपवण्यासाठी मास्क लावून आले होते.

नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि अनियमिततेच्या विरोधात आज पुण्यात विद्यार्थी संघटना व राजकीय पक्षांनी आक्रमक पवित्रा घेत आंदोलन केले. पुण्यातील मॉडर्न कॉलेज आणि डेक्कन परिसरात काँग्रेसची विद्यार्थी संघटना एनएसयुआय, युवक काँग्रेस आणि विविध विद्यार्थी संघटनांनी आंदोलने केली.

## मनीषा गुरुनाथ मांढरे निलंबित

नीट-युजी २६ पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने अटक केल्यानंतर प्राध्यापिका मनीषा गुरुनाथ मांढरेला कॉलेज प्रशासनाने निलंबित केले आहे. पुण्याच्या मॉडर्न कॉलेजात जीवशास्त्र विषयाच्या वरिष्ठ प्राध्यापिका म्हणून गेल्या २४ वर्षांपासून कार्यरत होती. एनटीए म्हणजे नॅशनल टेस्टिंग एजन्सीसोबत त्यांचा असलेला संबंध पूर्णपणे गोपनीय होता आणि त्याबाबत कॉलेजला कोणतीही कल्पना नव्हती, असे कॉलेजच्या प्राचार्यांनी स्पष्ट केले आहे.

# परिषदेत उद्धव ठाकरेंची केवळ ३१.५८% उपस्थिती

पान १ वरून - त्यांनी फक्त एकदाच सभागृहात हजेरी लावली होती. तसेच २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही १६ पैकी केवळ ४ बैठकींना ते उपस्थित होते. सभागृहाच्या कामकाजाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांमध्ये केवळ उद्धव ठाकरेच नाहीत, तर इतर काही बडे नेतेही असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. शिंदे गटाच्या भावना गवळी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रामराजे नाईक-निंबाळकर यांनी सलग तीन अधिवेशनांमध्ये एकदाही उपस्थिती दर्शवली नाही. दुसरीकडे अमोल मिटकरी आणि राजेश राठोड यांनी गेल्या सहा वर्षांतील १८ पैकी १३ अधिवेशनांत १०० टक्के उपस्थिती नोंदवली. राष्ट्रवादी काँग्रेसचे शशिकांत शिंदे यांनी १८ पैकी ११ अधिवेशनांत पूर्ण वेळ उपस्थित राहून आपली जबाबदारी पार पाडली आहे. याशिवाय सध्याच्या सदस्यांमध्ये मनीषा कायंदे, जगन्नाथ अभ्यंकर आणि सुधाकर आडबाले यांनीही अधिवेशनात १०० टक्के उपस्थिती राखत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

# उमर खालिदला जामीन मिळायला हवा होता! सुप्रीम कोर्टाचे निरीक्षण

पान १ वरून

असतो. त्यामुळे अशा निर्णयाचे पालन करणे आवश्यक आहे. शंका असल्यास प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे पाठवले पाहिजे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने ही टिप्पणी करताना युएपीए प्रकरणात सहा वर्षांपेक्षा जास्त काळ तुरुंगात असलेल्या सय्यद इफ्तिखार अंद्राबी यांना जामीन मंजूर केला.

खंडपीठाने जानेवारी २०२६ मधील त्या निर्णयाचाही उल्लेख केला ज्यात उमर खालिद आणि शरजील इमाम यांना जामीन नाकारण्यात आला होता. त्या निर्णयामागील भूमिका स्वीकारणे कठीण असल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने असेही स्पष्ट केले की, खटल्यापूर्वी दीर्घकाळ तुरुंगात ठेवणे हे शिक्षा स्वरूपाचे होऊ शकते. त्यामुळे जामीन हा नियम आणि तुरुंगवास हा अपवाद हे तत्त्व युएपीए प्रकरणांनाही लागू होते. उमर खालिद हा जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे माजी विद्यार्थी नेता आहे. फेब्रुवारी २०२० मधील दिल्ली दंगलीमागील कथित कटात सहभागी असल्याच्या आरोपावरून त्यांना अटक करण्यात आली होती. दिल्ली पोलिसांनी त्याच्यावर सीएएविरोधी आंदोलनादरम्यान चिथावणीखोर भाषणे केल्याचा आरोप ठेवला आहे.

# इंधनटंचाईमुळे पंपांवर रांगा

पान ८ वरून

आला. बुलडाण्यात कालच्या गोंधळानंतर आज पोलीस बंदोबस्तात इंधन विक्री सुरू झाली. वाशिम जिल्ह्यात सलग चौथ्या दिवशी डिझेल टंचाई कायम राहिल्याने पहाटेपासूनच शेतकरी आणि वाहनचालकांच्या रांगा लागल्या. गडचिरोलीत दोन दिवस पुरवठा ठप्प राहिल्याने दोन ते चार किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. रत्नागिरीत अनेक पेट्रोल पंप बंद होते. पिंपरी-चिंचवडमध्ये सुमारे ८० टक्के पेट्रोल पंप बंद राहिल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. जालन्यातही पेट्रोल-डिझेल मिळत नसल्याने मशागतीची कामे खोळंबली. सुटीचा हंगाम सुरू असल्याने परिस्थिती बिकट बनली.

इंधन दरवाढ आणि टंचाईविरोधात राज्यभर आंदोलनेही सुरू आहेत. आज ठाणे रेल्वे स्थानक परिसरात उबाठाच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. या आंदोलनात माजी खासदार राजन विचारे आणि जिल्हाप्रमुख केदार दिघे सहभागी झाले होते. पुण्यात शरद पवार गटाकडून महापालिकेवर बैलगाडी व टांगा मोर्चा काढण्यात आला. शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आंदोलनात केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. सांगलीत काँग्रेसतर्फे पेट्रोल पंपांसमोर निदर्शने करण्यात आली. शहर जिल्हाध्यक्ष राजेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली दरकपातीची मागणी करण्यात आली. दरवाढ सुरू राहिल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

# ट्रम्प यांचे ९० दिवसांत ३,७०० शेअर व्यवहार

पान १ वरून

अवलंबून राहावे लागते. तसेच मायक्रोसॉफ्ट, ॲमेझॉन आणि मेटासारख्या मोठ्या टेक कंपन्यांवर सतत अँटी ट्रस्ट चौकशी, एआय नियमन आणि फेडरल धोरणांचा परिणाम होत असतो.

यापूर्वीच्या अनेक माजी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी 'ब्लाईंड ट्रस्ट'चा वापर करून वैयक्तिक गुंतवणूक व्यवस्थापनापासून स्वतःला दूर ठेवले होते. 'ब्लाईंड ट्रस्ट' ही एक अशी आर्थिक व्यवस्था असते, ज्यामध्ये एखादी व्यक्ती आपल्या मालमत्तेचे संपूर्ण नियंत्रण एका स्वतंत्र विश्वस्ताकडे सोपवले जाते. लाभार्थी किंवा निर्मात्याला विशिष्ट गुंतवणुकीची माहिती नसते आणि त्यात हस्तक्षेप करण्याचा कोणताही अधिकार नसतो. याचा उपयोग प्रामुख्याने हितसंबंधांचे संघर्ष टाळण्यासाठी केला जातो. मात्र, ट्रम्प यांनी आपल्या व्यावसायिक हितसंबंधांपासून स्वतःला पूर्णपणे अलिप्त ठेवलेले नाही. त्यामुळेच त्यांच्यावर टीका होत आहे. ताज्या माहितीमुळे इराणविषयी ट्रम्प यांच्या सार्वजनिक वक्तव्यांपूर्वी तेल आणि शेअर बाजारात झालेल्या संशयास्पद व्यवहारांकडेही लक्ष वेधले गेले आहे. इराण चर्चेत प्रगती होत असल्याचे ट्रम्प यांनी सूचित करण्यापूर्वी काही गुंतवणूकदारांनी तेलाच्या किमती घसरणार आणि अमेरिकन शेअर बाजार वधारणार असा अंदाज बांधून मोठे व्यवहार केल्याची चर्चा होती. त्यानंतर खरोखरच तेलाच्या किमती घसरून शेअर बाजार तेजीत गेला. या व्यवहारांशी ट्रम्प यांचा थेट संबंध असल्याचा पुरावा समोर आलेला नसला, तरी संवेदनशील राजकीय माहिती आणि आर्थिक बाजार यांच्या संभाव्य संबंधांवर चर्चा होत आहे.

ट्रम्प यांचे जावई आणि मध्य पूर्व विषयक दूत जॅरेड कुशनर यांच्या आखाती देशांतील आर्थिक हितसंबंधांवरही पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यांची गुंतवणूक कंपनी 'ॲफिनिटी पार्टनर्स' सौदी अरेबियासह मध्य पूर्वेत अब्जावधी डॉलरची गुंतवणूक करत असल्याचे म्हटले जात आहे. व्हाईट हाऊसने ट्रम्प यांच्यावरील सर्व आरोप फेटाळत ते नेहमी अमेरिकन जनतेच्या हितासाठीच काम करतात आणि त्यांचे कोणतेही हितसंबंध नाहीत, असे स्पष्ट केले आहे. 'द ट्रम्प ऑर्गनायझेशन'च्या प्रवक्त्यांनी सांगितले की, ट्रम्प यांच्या गुंतवणुकीचे व्यवस्थापन स्वतंत्र वित्तीय संस्थांकडून केले जाते. ट्रम्प किंवा त्यांचे कुटुंबीय थेट व्यवहार नियंत्रित करत नाहीत. मात्र यामुळे सत्तेवर असलेल्या राष्ट्राध्यक्षांनी सरकारी धोरणांवर प्रभाव टाकणाऱ्या कंपन्यांमध्ये सक्रियपणे शेअर व्यवहार करावेत का, याबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# डहाणूत वऱ्हाडाच्या ट्रकच्या भीषण अपघातात १२ ठार

पान १ वरून

रुग्णालयात हलविण्यात आले असून, अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. अपघातामुळे मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

मृतांची नावे - सुरेश रत्ना लाखात, पांडू गणपत लाखात, कलू गोविंद लाखात, सुनिल अर्जुन दांडेकर, चित्रा गोविंद कुऱ्हाडा, नमिता विठ्ठल दांडेकर, सरिता संतोष लाखात, सागर नामदेव शेंडे, वंदना सिताराम वळवी, सलोनी शिवराम वळवी, एकाची ओळख पटलेली नाही.

**TENDER NOTICE**

Sealed Tender Bids are invited by

**Moroccan Co-operative Housing Society Ltd.**

from MSEDCL Empaneled Electrical Contractors / Agencies for the following work: "Repair / Replacement of Electrical Wiring System including Meters, MCB, RCCB and allied electrical works on Turnkey Basis including supply of materials, labour, testing and commissioning OR for Labour Contract only."

Tender documents may be collected from the Society Office at: Moroccan CHSL, Royal Palms Estate, Aarey Colony, Goregaon (East), Mumbai – 400065.

Tender document collection period: From **20 May 2026** to **24 May 2026** during office working hours.

Interested bidders shall submit valid MSEDCL Empanelment details along with necessary credentials and experience documents.

For further details contact: **Mob.: 9004739200**
**Email: moroccanchs@gmail.com**

**जाहीर सूचना**

श्री. मोहम्मद नुरुस अब्दुल रहीम शेख, हे दि वसुधा सोशल डेव्हलपमेंट फॉरेस्ट्री अँण्ड ट्री प्लान्टेशन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., पत्ता - वेडसई, वाफेघर, वेल्ह पोस्ट भैरव, सुधागड, रायगड, महाराष्ट्र चे सदस्य, तसेच प्रत्येकी रु.५०/- असलेल्या आणि एकूण रु.५००/- किमतीच्या विशिष्ट क्र.२३९१ ते २४०० असलेल्या (दोन्ही समाविष्ट) १० पूर्णतः भरणा झालेल्या समभागांचे भाग प्रमाणपत्र क्र.२५५ मधील ५०% समभाग, हक्क, अधिकार, हितसंबंध आणि लाभ चे धारक, तसेच सोसायटीमधील प्लॉट क्र.पी-७४ मधील ५०% अविभाजित हिस्सा, हक्क, शिर्षक, हितसंबंध व लाभ होते, त्यांचे दिनांक १२.०९.२०२३ रोजी विनामृत्युपत्र निधन झाले. सोसायटी याव्दारे, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील, मयत सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरण होण्यास वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून १४ दिवसांत सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावा/आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्याच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत. वर दिलेल्या मुदतीत जर काही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटीच्या नोंदणीकृत उपविधींची प्रत दावेदार/आक्षेपकाव्दारे निरीक्षणाकरिता सोसायटीचे कार्यालय/सोसायटीचे सचिव यांच्याकडे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत सर्व कामकाजाच्या दिवशी सायं.५.०० ते ८.०० वा. दरम्यान उपलब्ध आहेत.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १९.०५.२०२६
सही/-
**दि वसुधा सोशल डेव्हलपमेंट फॉरेस्ट्री अँण्ड ट्री प्लान्टेशन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.**
सचिव

# औषध विक्रेत्यांचा व्यवसाय संकटात

पान १ वरून

त्यामुळे सध्याची ऑनलाईन औषध विक्री बेकायदेशीर आहे. याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून, न्यायालयाने स्थगिती दिली आहे. कोरोना कालावधीत सरकारने औषधांची घरपोच पोहोचवण्याबाबत विशेष सूट दिली होती. परंतु ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून प्रिस्क्रिप्शन औषधांचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होत आहे. नशेसाठी वापरली जाणारी औषधे, एमटीपी किट्स, सिडेनाफिलसारखी औषधे सहज उपलब्ध होत आहेत. स्थानिक केमिस्ट प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध देत नाहीत. मात्र, ऑनलाईन कंपन्या केवळ एक फोन करून त्यावर काही प्रश्न विचारून औषध घरपोच पाठवतात. यामुळे तरुण पिढीच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. याशिवाय आजकाल बनावट पॅकिंग इतके हुबेहूब असते की मूळ कंपनीलाही फरक ओळखणे कठीण जाते. ग्राहकाला केवळ डिस्काउंट दिसतो. पण औषधाची गुणवत्ता, साठवणूक, तापमान नियंत्रण याबाबत काहीही माहिती नसते. ते पुढे म्हणाले की, कॉर्पोरेट कंपन्या हजारो कोटींचा तोटा सहन करून या कंपन्या २० ते ५० टक्क्यांपर्यंत सवलत देत आहेत. त्यामुळे छोट्या औषध दुकानदारांचा व्यवसाय धोक्यात आला आहे. ही व्यावसायिक स्पर्धा नसून बाजारपेठ काबीज करण्याची रणनीती आहे. आधी छोटे व्यापारी संपवायचे आणि नंतर बाजारावर नियंत्रण मिळवायचे. महाराष्ट्रात सव्वा लाखांहून अधिक औषध विक्रेते आहेत. तर देशभरात साडेबारा लाख विक्रेते आणि त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे. ग्रामीण भागात छोटी औषध दुकानेच लोकांसाठी उपयुक्त ठरतात. हा लढा फक्त व्यापारासाठी नाही, तर जनतेच्या आरोग्यासाठी आहे.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that I, Miss.Mahazarin Feroze Dastoor, residing at Sion Mansion, Flat No. 2,1st Floor, Next to Sion Bus Depot, Sion-West Mumbai-400022, have lost/misplaced the following bond certificate.

| NAME | BOND NAME | Amount | CERTIFICATE NUMBER | FOLIO NUMBER | DISTINCTIVE NUMBER |
|---|---|---|---|---|---|
| MAHAZARIN FEROZE DASTOOR | INDIA INFRASTRUCTURE FINANCE COMPANY LIMITED TAX FREE BOND TRANCHE1 SERIES 2 | 1000000 | 200137 | IFB0200137 | 0000066754 TO 0000067753 |
| MAHAZARIN FEROZE DASTOOR | INDIAN RAILWAY FINANCE CORPORATION LIMITED TAX FREE BOND TRANCHE 1 SERIES 2 | 1000000 | 100246 | IRB0100246 | 161546 TO 162545 |
| MAHAZARIN FEROZE DASTOOR | HOUSING AND URBAN DEVELOPMENT CORPORATION LIMITED TAX FREE BOND TRANCHE1 SERIES 2 | 1000000 | 100635 | HUH0100635 | 382383 TO 383382 |
| MAHAZARIN FEROZE DASTOOR | HOUSING AND URBAN DEVELOPMENT CORPORATION LIMITED TAX FREE BOND TRANCHE II SERIES 2 | 1000000 | 100100 | HUI0100100 | 57514 TO 58513 |
| MAHAZARIN FEROZE DASTOOR | POWER FINANCE CORPORATION LIMITED TAX FREE BOND TRANCHE 1 SERIES 2 | 1000000 | 1188 | 00101188 | 200107496 TO 200108495 |
| MAHAZARIN FEROZE DASTOOR | POWER FINANCE CORPORATION LIMITED TAX FREE BOND TRANCHE II SERIES 2 | 1000000 | 455 | 200455 | 200037450 TO 200038449 |
| MAHAZARIN FEROZE DASTOOR | RURAL ELECTRIFICATION CORPORATION LIMITED TAX FREE BOND TRANCH1 SERIES 2 | 1000000 | 100431 | REB0100431 | 641980 TO 642979 |
| MAHAZARIN FEROZE DASTOOR | RURAL ELECTRIFICATION CORPORATION LIMITED TAX FREE BOND TRANCH II SERIES 2 | 1000000 | 100053 | REC0100053 | 32495 TO 33494 |

I intend to apply for a duplicate bond certificate. Any person(s) having any claim/objection in respect thereof is/are requested to notify the undersigned or the company's registrar within 14 days from the date of this notice.

**Name: Miss. Mahazarin Feroze Dastoor**
**Contact No.: 9819000104**

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)

**निविदा सूचना**

क्षेत्रीय रेल्वे व्यवस्थापक, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, कारवार यांच्या वतीने, वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, ireps.gov.in प्रणालीद्वारे खालील खुल्या निविदा मागवित आहेत.

**अनु क्र. 1, कामाचे नाव –** गोवा राज्यातील कोकण रेल्वेच्या एसईएन/मडगाव विभागांतर्गत पेडणे बोगद्याच्या अस्तरयुक्त भागामागील स्तरांची माहिती मिळविणे तसेच कोणतीही पोकळी निर्माण झाली आहे का हे ओळखण्यासाठी भूभौतिकीय तपासणी करणे. **निविदा क्र.: केआर-केडब्ल्यू-ओएल-डब्ल्यू-2026-08-आरबी-आरटी1, कामाचा खर्च:** ₹ 82.39/- लाख (जीएसटी वगळून) **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** 04/06/2026, दुपारी 15.00 वाजेपर्यंत.

**अनु क्र. 2, कामाचे नाव –** गोवा राज्यातील एसएसई/पी.वे/मडगाव विभागांतर्गत मडगाव व वेरणा यार्डमधील गवत व तण काढण्याचे काम 2 वर्षांच्या कालावधीसाठी करणे. **निविदा क्र.: केआर-केडब्ल्यू-ओएल-डब्ल्यू-2026-23-आरबी, कामाचा खर्च:** ₹ 18.19/- लाख (जीएसटी वगळून) **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** 04/06/2026, दुपारी 15.00 वाजेपर्यंत.

**अनु क्र. 3, कामाचे नाव –** कर्नाटक राज्यातील एसएसई/पी.वे/उडुपी विभागांतर्गत कटिंगच्या उतारांवरील झाडे तोडण्यासह वनस्पती साफसफाई करणे. **निविदा क्र.: केआर-केडब्ल्यू-ओएल-डब्ल्यू-2026-24-आरबी, कामाचा खर्च:** ₹ 33.68/- लाख (जीएसटी वगळून) **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** 04/06/2026, दुपारी 15.00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, कारवार यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा संकेतस्थळाला भेट द्यावी. (www.ireps.gov.in)

# मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे पहिले छायाचित्र प्रसिद्ध

**नवी दिल्ली -** भारताच्या महत्त्वाकांक्षी बुलेट ट्रेनचे पहिले छायाचित्र आज प्रसिद्ध झाले आहे. रेल्वे मंत्रालयाच्या ४ क्रमांकाच्या प्रवेशद्वारावर आज बुलेट ट्रेनचे हे छायाचित्र लावण्यात आले आहे. मुंबई-अहमदाबाद अशा ५०८ किलोमीटरच्या हाय स्पीड रेल कॉरिडॉरमध्ये ही बुलेट ट्रेन धावणार आहे. या प्रकल्पाचे ५७ टक्के काम यावर्षीच्या जानेवारीपर्यंत पूर्ण झाले आहे.



# भाजपात आयारामांची चांदी

**भारतीय जनता पक्षाने अवघ्या एका महिन्याच्या अवधीत बिहार व पश्चिम बंगाल या दोन मोठ्या राज्यांना असे दोन नवीन मुख्यमंत्री दिले की ते पक्षातले आयाराम तर आहेतच पण त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा भाजपाच्या विचार प्रणालीशी काहीही संबंध नाही. मात्र त्या त्या राज्यात पक्ष विस्तारासाठी पक्षाच्या हायकमांडला जे जे अपेक्षित आहे, ते ते दोन्ही नेते करून दाखवतील अशी त्यांची क्षमता आहे. बिहारमध्ये नितीश कुमार यांना हटवून भाजपाने सम्राट चौधरी यांच्यावर राजमुकूट चढवला तर पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींना दोन वेळा पराभूत करणाऱ्या सुवेंदू अधिकारी यांचा राज्याभिषेक केला. ते भाजपात आले व त्यांचे नशीब फळफळले असेच म्हणावे लागेल.**

**सुवेंदू अधिकारी (पश्चिम बंगाल) -** मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी हे २०२१ मध्ये भाजपात आले. त्यापूर्वी ते तृणमल काँग्रेसमध्ये ममता बॅनर्जी यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जायचे. सुवेंदू हे अगोदर काँग्रेसमध्ये होते. त्यांचे वडील शिशिर अधिकारी हे तर डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारमध्ये केंद्रीयमंत्री होते. सुवेंदू यांनीही १९९५ मध्ये काँग्रेस पक्षातून करिअरला सुरूवात



केली. मेदिनीपूर नगर परिषदेत ते काँग्रेसचे नगरसेवक म्हणून निवडून आले होते. १९९८ मध्ये ममता बॅनर्जी काँग्रेस सोडून तृणमूल काँग्रेस हा स्वत: पक्ष स्थापन केला, तेव्हा सुवेंदू व त्यांचा परिवार तृणमूल काँग्रेसमध्ये सामील झाला. २००६ मध्ये कांथी दक्षिण मतदारसंघातून तृणमूल काँग्रेसचे आमदार म्हणून विधानसभेत निवडून गेले होते. २०२० च्या सुमारास ममता यांनी त्यांचा भाचा अभिषेक बॅनर्जी यांना पक्षाचा चेहरा म्हणून प्रकाशात आणायला सुरूवात केली, तेव्हापासून सुवेंदूंचे बिनसले. त्यानंतर सुवेंदू यांनी डिसेंबर २०२० मध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत सुवेंदू यांनी नंदिग्राममध्ये ममता यांचा पराभव केल्याने भाजपामध्ये त्याचे महत्त्व वाढले. २०२६ च्या निवडणुकीत त्यांनी ममता यांचा भवानीपूरमध्ये पराभव केलाच पण नंदिग्राम व भवानीपूर अशा दोन्ही ते मतदारसंघातून निवडून आले.

**सम्राट चौधरी (बिहार)**-भाजपात असले तरी त्यांचा प्रवास भरपूर इकडून तिकडून फिरून झाला आहे. सम्राट यांचे वडील



शकुनी चौधरी हे तर वेगवेगळ्या पक्षातून आमदार, खासदार व मंत्री झाले. शकुनी चौधरी हे समता पार्टीचे एक संस्थापक सदस्य होते. सम्राट चौधरी यांनी १९९० च्या दशकात समता पार्टीपासून राजकारणात प्रवेश केला. मे १९९९ मध्ये राबडी देवींच्या नेतृत्वाखालील राजद सरकारमध्ये ते कृषी मंत्री होते. नंतर सम्राट यांनी लालूप्रसाद यांच्या राजदच्या तिकिटावर निवडणुका लढल्या. २०१४ मध्ये त्यांनी नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेडमध्ये प्रवेश केला. जेव्हा जतिराम मांझी यांनी नितीश कुमार यांच्याविरोधात बंड केले, तेव्हा सम्राट यांनी मांझी यांच्या हम या पक्षाचे समर्थन केले. जनता दल यु व हम यांच्यात राजकीय रस्सीखेच चालू असताना सम्राट चौधरी यांनी २०१७ मध्ये थेट भाजपाचा रस्ता पकडला. २०१८ मध्ये त्यांची प्रदेश भाजपाचे उपाध्यक्ष म्हणून नेमणूक झाली. २०२१ मध्ये एनडीएच्या सरकारमध्ये ते पंचायत राज मंत्री झाले. २०२२ मधे विधान परिषदेत ते विरोधी पक्षनेते झाले. २०२३ मध्ये प्रदेश भाजपाचे अध्यक्ष झाले. २०२४ मध्ये नितीश कुमार एनडीएमध्ये परतले व त्यांच्या

**- डॉ. सुकृत खांडेकर**

सरकारमध्ये सम्राट उपमुख्यमंत्री झाले. २०२५ ची विधानसभा निवडणूक जनता दल यू व भाजपाने युती करून लढवली. निकालानंतर नितीश कुमार हे मुख्यमंत्री झाले व सम्राट चौधरी पुन्हा उपमुख्यमंत्री बनले. अवघ्या वर्षाच्या आतच नितीश कुमार यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊन राज्यसभेत जावे लागले व त्यांच्या जागेवर सम्राट चौधरी भाजपाचे पहिले मुख्यमंत्री झाले.

**हिमंता बिस्व सरमा (आसाम)** - २००१, २००६ आणि २०११ असे तीन वेळा काँग्रेसच्या तिकीटावर जालुकबारी मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. २००२ ते २०१४ या काळात तरुण गोगोई यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सरकारमध्ये ते मंत्री होते. ऑगस्ट २०१५ मध्ये ते



भाजपामध्ये सामील झाले. २०१६ मध्ये सर्वानंद सोनोवाल यांच्या नेतृत्वाखालील भाजपाच्या पहिल्या सरकारमध्ये मंत्री झाले. २०२१ मध्ये विधानसभा निवडणूक निकालानंतर सोनोवाल केंद्रात मंत्री म्हणून गेले व सरमा मुख्यमंत्री झाले. २०२६ च्या निवडणुकीनंतर सरमा दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले.

**अर्जुन मुंडा (झारखंड)** - राजकीय जीवनाला १९८० च्या सुमारास झारखंड मुक्ती मोर्चापासून सुरूवात केली. १९९५ मध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचे आमदार म्हणून ते बिहार



विधानसभेवर निवडून गेले. नंतर ते भाजपामध्ये सामील झाले. २००० च्या निवडणुकीत ते भाजपाचे आमदार म्हणून बिहार विधानसभेवर निवडून गेले. त्याचवर्षी झारखंड स्वतंत्र राज्य निर्माण झाले. बाबूलाल मरांडी यांच्या नेतृत्वाखालील पहिल्या एनडीए सरकारमध्ये ते आदिवासी कल्याणमंत्री होते. वयाच्या ३५ व्या वर्षी ते २००३ मधे ते झारखंडचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतरही त्यांना मुख्यमंत्रिपदाची संधी मिळाली.

**सर्वानंद सोनोवाल (आसाम)** - २००१ मधे आसाम गण परिषदेच्या तिकीटावर मोरानमधून आमदार व २००४ मध्ये दिब्रुगडमधून खासदार म्हणून निवडून आले होते. फेब्रुवारी २०११ भाजपाचे तत्कालीन राष्ट्रीय



अध्यक्ष नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. २०१४ मध्ये मोदींच्या सरकारमध्ये ते केंद्रात मंत्री झाले. २०१६ मध्ये आसामचे मुख्यमंत्री झाले.

**एन. बिरेन सिंह (मणिपूर)** - राज्यात काँग्रेसच्या तिकीटावर तीन वेळा आमदार झाले. काँग्रेस सरकारमध्ये मंत्री होते. २०१६ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री ओकराम बिबोबी सिंह यांच्या विरोधात बंड केले व भाजपामध्ये सामील झाले. २०१७ मध्ये



भाजपाचे आमदार म्हणून निवडून आले. भाजपाप्रणित आघाडी सरकारचे मुख्यमंत्री झाले.

**गेगॉन्ग अपांग (अरुणाचल प्रदेश)** - १९७२ पासून काँग्रेसमध्ये होते. १९७८ मध्ये पहिली विधानसभा निवडणूक झाल्यावर ते सरकारमध्ये मंत्री होते. १९८० मध्ये वयाच्या ३४ व्या वर्षी ते अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री झाले. ते १९९९ पर्यंत या पदावर होते. ऑगस्ट २००३ मध्ये अपांग आपल्या समर्थकांसह भाजपामध्ये सामील झाले.



ईशान्येकडील राज्यात भाजपाचे पहिले सरकार अरुणाचलमधे बनले व अपांग मुख्यमंत्री झाले. २००४ च्या निवडणुकीत भाजपाचा पराभव झाल्यावर अपांग पुन्हा काँग्रेसमध्ये आले व मुख्यमंत्री झाले. २०१४ मध्ये ते परत भाजपामध्ये आले व २०१९ मधे पुन्हा भाजपाला सोडचिठ्ठी दिली.

**पेमा खंडू ( अरुणाचल प्रदेश )** माजी मुख्यमंत्री दोरजी खंडू यांचे पुत्र. २०१६ मध्ये काँग्रेसचे मुख्यमंत्री होते. काही महिन्यांतच पेमा खंडूसह ४३ आमदारांनी बंड केले व भाजपाच्या सहयोगी पक्षात सामील झाले. सहयोगी



पक्षातही बंडखोरी झाली, मग ते समर्थक आमदारांसह भाजपामध्ये सामील झाले व भाजपाचे मुख्यमंत्री झाले. २०१९ व २०२४ च्या निवडणुकीत भाजपाला बहुमत मिळाले व पेमा खंडू पुन्हा मुख्यमंत्री झाले.

**माणिक साहा ( त्रिपुरा )** - २०१६ पर्यंत काँग्रेसचे सदस्य होते. त्याच वर्षी भाजपात सामील झाले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बनले. तत्कालीन मुख्यमंत्री बिप्लब कुमार देब यांनी अचानक



राजीनामा दिल्यानंतर मार्च २०२२ मध्ये त्रिपुराचे ११ वे मुख्यमंत्री झाले.

**बसवराज बोम्मई ( कर्नाटक )**- माजी मुख्यमंत्री एस. आर. बोम्मई यांचे पुत्र. जनता दलात होते. रामकृष्ण हेगडे व देवेगौडा यांच्याबरोबर काम केले. धारवाडमधून विधान परिषदेवर आमदार होते. २००८ मध्ये



भाजपामध्ये सामील झाले. भाजपाचे येडियुरप्पा यांच्या सरकारमध्ये ते मंत्री होते. जुलै २०२१ मध्ये भाजपाचे चौथे मुख्यमंत्री झाले.

**यु. के. सिंह (मणिपूर)** - २०१२ मध्ये तृणमूल काँग्रेसच्या तिकीटावर लढले. २०१३ मध्ये भाजपामध्ये सामील झाले. २०१७ मध्ये भाजपाचे आमदार झाले. २०२२ मध्ये बिरेन सिंह सरकारमध्ये मंत्री झाले. फेब्रुवारी २०२६ मध्ये मुख्यमंत्री झाले.

# व्ही.डी.सतीशन केरळचे नवे मुख्यमंत्री
## ६४ वर्षांनंतर मंत्रिमंडळाचाही शपथविधी

■ तिरुवनंतपुरम

**केरळ** विधानसभा निवडणुकीनंतर दोन आठवड्यांनी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ सरकार स्थापन झाले. आज व्ही.डी. सतीशन यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. तिरुवनंतपुरम येथील सेंट्रल स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सोहळ्यात सतीशन यांच्यासह एकूण २० मंत्र्यांनीही शपथ घेतली. विशेष म्हणजे, सुमारे ६४ वर्षांनंतर केरळमध्ये मुख्यमंत्री आणि संपूर्ण



मंत्रिमंडळाचा एकाच वेळी शपथविधी पार पडला.

यापूर्वी १९६२ साली तत्कालीन मुख्यमंत्री आर. शंकर यांनी आपल्या मंत्रिमंडळासह एकत्र शपथ घेतली होती. परंतु १९६४ मध्ये अविश्वास ठरावानंतर त्यांचे सरकार कोसळले होते. नव्या मंत्रिमंडळात इंडियन युनियन मुस्लीम लीगच्या (आययूएमएल) पाच आमदारांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली. मुस्लीम लीग हा केरळमधील काँग्रेसचा एक प्रमुख मित्रपक्ष असून, त्यांचे २२ आमदार आहेत. केरळच्या मंत्रिमंडळात १४ आमदारांनी प्रथमच मंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

# समाज माध्यमांवर 'कॉक्रोच पार्टी'
## महुआ मोईत्रा, कीर्ती आझाद सदस्य

■ नवी दिल्ली

**सरन्यायाधीश** सूर्य कांत यांनी दोन दिवसांपूर्वी एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान देशातील तरुण पिढीचा उल्लेख कॉक्रोच असा केला होता. त्यांच्या या वक्तव्यावरून देशभरातील तरुणांमध्ये नाराजीचे सूर उमटले. सरन्यायाधीशांच्या या वक्तव्यावर एक्स सोशल मीडियावर एक उपहासात्मक खाते उघडण्यात आले असून त्याचे नाव 'कॉक्रोच जनता पार्टी' असे ठेवण्यात आले आहे. अवघ्या चोवीस तासांत या खात्याला १५ हजार फॉलोअर्स लाभले आहेत. त्यामध्ये तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा आणि क्रिकेटर-राजकारणी कीर्ती आझाद यांचा समावेश आहे.

दिल्ली उच्च न्यायालयातील एका वकिलाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या एका याचिकेवर गेल्या आठवड्यात सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. ज्यॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

# पुजाऱ्यांना किमान वेतन द्या
## जनहित याचिका फेटाळली

**नवी दिल्ली** - देशभरातील राज्य सरकारांच्या ताब्यात असलेल्या मंदिरांमधील पुजारी, सेवेकरी आणि अन्य कर्मचाऱ्यांना किमान वेतन निश्चित करण्यासाठी न्यायालयीन आयोग स्थापन करावा किंवा तज्ज्ञांची समिती नेमावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. भाजपाचे नेते आणि पेशाने वकील असलेले अश्विनीकुमार उपाध्याय यांनी ही जनहित याचिका दाखल केली होती. न्या.विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर ही याचिका सुनावणीस असता प्रथमदर्शनी खंडपीठाने याचिका फेटाळली.

# १५५ कोटींच्या बँक घोटाळा प्रकरणी
## आपचे नेते दीपक सिंगला यांना अटक

■ नवी दिल्ली

**ईडीने** आज आपचे नेते दीपक सिंगला यांना १५५ कोटी रुपयांच्या कथित बँक घोटाळा प्रकरणात अटक केली. महेश टिंबर प्रायव्हेट लिमिटेडशी संबंधित या प्रकरणात ही कारवाई करण्यात आली.

ईडीच्या पथकाने आज सकाळी दिल्ली आणि गोवा येथील सात ठिकाणी छापे टाकले. या कारवाईदरम्यान दीपक सिंगला, महेश सिंग आणि अमरिका गिल यांच्याशी संबंधित ठिकाणांची झाडाझडती घेण्यात आली. छाप्यात सापडलेल्या कागदपत्रे आणि पुराव्यांच्या आधारे दीपक सिंगला यांना ताब्यात घेण्यात आले. हे प्रकरण महेश टिंबर प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध दाखल १५५ कोटी रुपयांच्या बँक फसवणुकीशी संबंधित आहे. ईडीच्या प्राथमिक तपासानुसार संबंधित कंपन्या आणि व्यक्तींनी बँकांची फसवणूक करून मोठी रक्कम अपहार केल्याचा आरोप आहे.



या घोटाळ्यात दीपक सिंगला यांचा थेट सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तसेच महेश सिंग आणि अमरिका गिल यांची नावेही या प्रकरणात उघड झाली आहेत. यापूर्वी ९ मे रोजी ईडीने पंजाबमधील मंत्री संजीव अरोरा यांना एका स्वतंत्र प्रकरणात अटक केली होती. अवघ्या नऊ दिवसांत 'आप'च्या दोन नेत्यांवर कारवाई झाल्याने पक्षाने केंद्र सरकारवर टीका केली आहे.

# अंगणवाडी सेविकांसाठी दिलासा
## पदोन्नतीतील ४५ वर्षांची अट रद्द

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ नागपूर

**अंगणवाडी** सेविकांना पर्यवेक्षिकापदावर पदोन्नती देताना लागू करण्यात आलेली ४५ वर्षांची कमाल वयोमर्यादा भेदभावपूर्ण आणि घटनाविरोधी असल्याचे स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने संबंधित नियम रद्दबातल ठरवला आहे. न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

अकोला जिल्ह्यातील दहा अंगणवाडी सेविकांनी यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. महिला व



बालविकास विभागाने ४ जून २०२१ रोजी जारी केलेल्या सेवा प्रवेश नियमांमधील नियम ७(१) (क) ला या याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले होते. या नियमामुळे पर्यवेक्षिकापदासाठी पदोन्नतीची कमाल वयोमर्यादा ५५ वर्षांवरून थेट ४५ वर्षांवर आणण्यात आली होती. याचिकाकर्त्या सेविका गेल्या दोन दशकांहून अधिक काळ अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत आहेत. २००१ च्या शासन निर्णयानुसार दहा वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या आणि आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेल्या सेविकांना पर्यवेक्षिकापदावर पदोन्नती देण्याची तरतूद करण्यात आली होती.

# परदेशी गुंतवणुकदारांचा भारतीय शेअर बाजारातून काढता पाय

**मे मध्येच २७ हजार कोटी बाजारातून काढून घेतले**

■ नवी दिल्ली

**जागतिक** आर्थिक अस्थिरता, भू-राजकीय तणाव आणि वाढत्या कच्च्या तेलाच्या किमती यांमुळे चालू मे महिन्यातही परदेशी गुंतवणुकदारांचा भारतीय शेअर बाजारातून काढता पाय सुरूच आहे. परदेशी गुंतवणुकदारांनी मे महिन्यात आतापर्यंत तब्बल २७,०४८ कोटी रुपये काढून घेतले आहेत.

नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या ताज्या आकडेवारीनुसार, यावर्षी परदेशी गुंतवणुकदारांनी केलेल्या विक्रीने मागील सर्व विक्रम मोडले आहेत. एफपीआयने २०२६ मध्ये आतापर्यंत देशांतर्गत शेअर बाजारातून २.२ लाख कोटी रुपये काढून घेतले आहेत. या आकड्याचा अंदाज यावरून लावता येतो की, संपूर्ण वर्ष २०२५ मध्ये परदेशी गुंतवणुकदारांनी बाजारातून एकूण १.६६ लाख कोटी रुपये काढून घेतले होते. याचा अर्थ असा की, केवळ पहिल्या पाच महिन्यांतच संपूर्ण मागील वर्षापेक्षा जास्त विक्री झाली आहे, जो बाजारासाठी एक मोठा धक्का आहे. या वर्षाच्या सुरुवातीला जानेवारीत एफपीआयने ३५,९६२ कोटींचे शेअर्स विकले.

# कोरेगाव पार्कमध्ये पार्टीहून परतणाऱ्या
## महिलेवर कारमध्ये लैंगिक अत्याचार

■ पुणे

**पुण्यातील** पब संस्कृतीसाठी प्रसिद्ध असलेल्या कोरेगाव पार्क परिसरात काल रात्री एक धक्कादायक घटना घडली आहे. मध्यरात्री हॉटेलमधील पार्टी आटोपून परतणाऱ्या एका महिलेवर कारमध्ये लैंगिक अत्याचार करण्यात आला. याप्रकरणी कोरेगाव पार्क पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना अटक करण्यात आली आहे. पीडित महिला कोरेगाव पार्क परिसरातील एका प्रसिद्ध हॉटेलमध्ये पार्टीसाठी आली होती. याच पार्टीदरम्यान तिची एका पुरुषाशी ओळख झाली. पार्टी संपल्यानंतर रात्री उशिरा हॉटेलबाहेर पडताना संबंधित व्यक्तीने महिलेला 'घरी सुरक्षित सोडतो' असे सांगत विश्वासात घेतले व तिला आपल्या कारमध्ये बसवले. मुंढवा ते कोरेगाव पार्क मार्गावरून कार जात असताना आरोपीने महिलेसोबत गैरवर्तन करण्यास सुरुवात केली.

# दिलीप कुमार, राज कपूर यांची
## वडिलोपार्जित घरे धोकादायक स्थितीत

■ पेशावर

**पाकिस्तानातील** पेशावर येथे असलेली दिग्गज भारतीय अभिनेते दिलीप कुमार आणि राज कपूर यांची वडिलोपार्जित घरे



कधीही कोसळू शकतात, असा इशारा वारसा संवर्धन तज्ज्ञ आणि स्थानिक नागरिकांनी दिला आहे. अलीकडील भूकंपानंतर आणि सततच्या पावसामुळे या ऐतिहासिक इमारती अत्यंत धोकादायक अवस्थेत पोहोचल्या आहेत. उत्तर-पश्चिम पाकिस्तानातील पेशावर शहरातील ही दोन्ही घरे पाकिस्तान सरकारने २०१६ मध्ये राष्ट्रीय वारसा स्थळ म्हणून घोषित केली होती. मात्र, मान्सूनपूर्व पाऊस आणि आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या इमारतींची दयनीय अवस्था समोर आली असून, तातडीने संवर्धन करण्याची मागणी तज्ज्ञांनी केली आहे. पेशावरमधील किस्सा ख्वानी बाजार परिसरातील ढाकी नलबंदी येथे असलेली शंभर वर्षांहून जुनी कपूर हवेली ही एकेकाळी शहराच्या वास्तुकलेचा मानबिंदू मानली जात होती. मात्र सततच्या पावसामुळे इमारतीची रचना कमकुवत झाली असून, ३ एप्रिल रोजी झालेल्या भूकंपाच्या धक्क्यांमुळे आधीच जीर्ण झालेली ही इमारत आणखी अस्थिर झाली आहे.

# एअर शोदरम्यान अमेरिकेची दोन लढाऊ विमाने हवेत धडकली! सर्व क्रू सदस्य सुरक्षित

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेतील** माउंटन होम एअर फोर्स बेस येथे काल आयोजित करण्यात आलेल्या एअर शोदरम्यान अमेरिकन नौदलाची दोन ईए-१८जी ग्राउलर लढाऊ विमाने हवेत एकमेकांना धडकली. सुदैवाने सर्व चार क्रू सदस्य सुरक्षितपणे बाहेर पडले. या अपघातानंतर संपूर्ण एअर बेस लॉकडाऊन करण्यात आला. ही घटना अमेरिकेतील आयडाहो राज्यात सुरू असलेल्या 'गनफायटर स्काइज एअर शो' दरम्यान दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. अपघातानंतर घटनास्थळी तातडीने आपत्कालीन पथके दाखल



झाली. अपघातस्थळाजवळ काळ्या धुराचे मोठे लोट दिसून आले.

अपघातग्रस्त दोन्ही विमाने एअर बेसपासून सुमारे दोन मैल अंतरावर कोसळली. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये दोन्ही विमाने हवेत धडकल्यानंतर तुकडे होत खाली पडताना दिसतात. त्यानंतर चार पॅराशूट जमिनीकडे उतरताना दिसले.

# इंधनटंचाईमुळे पंपांवर रांगा
## ठाणे, पुणे, सांगलीत आंदोलने

■ हिंगोली

**राज्यात** इंधन टंचाईमुळे अनेक ठिकाणी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. पेट्रोल-डिझेलच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे पंपांवर लांबच लांब रांगा लागत असून, नागरिक, शेतकरी आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आज ठाणे, सांगली आणि पुण्यात इंधन दरवाढ आणि टंचाईविरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली.

हिंगोलीतील कळमनुरी रस्त्यावरील दासिना फाटा येथे रांगेची शिस्त न पाळल्यामुळे चालकाने डिझेल देण्यास नकार दिल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. सकाळपासूनच पेट्रोल पंपांवर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. खरीप हंगामाच्या तोंडावर डिझेल उपलब्ध नसल्याने शेतकरी आक्रमक झाले. काल हिंगोलीतील पेट्रोल पंपावर हाणामारी झाल्यानंतर आज प्रशासन सतर्क झाले. परिस्थिती लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना सुरू करण्यात आल्या. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पेट्रोलियम कंपन्यांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेत पुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश दिले. साठेबाजी किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही देण्यात

» पान ७ वर